सन १८८८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०५५
सन १८९५

ग्रंथ संग्रहालय
ठाणें.

नं. ३२२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
काव्य
संग्रहालय क्रमांक
लेखक श्रीमत्परमहंस
सन १८८८
पुस्तकाचें नांव

# श्रीपरमेश्वरज्ञानदर्शन

किंवा

# हिंदुधर्ममतमंडण.

हा ग्रंथ

श्रीसद्गुरु परमहंस वैवस्वन

## स्वामी महाराज

यांनीं लिहिला तो

सिताराम रघुनाथ अधिकारीयांनीं
छापवून प्रसिद्ध केला असे

मुंबई.

“जगद्दर्शक” छापखान्यांत छापीं.

सन १८९५

किंमत ५॥ आणे.

सर्वहक्क प्रकाशकानें आपलेकडे ठेविले
आहेत.

# परमेश्वर व सृष्टिरचना.




वर दोनच ध्रुव मंडळांचा नमूना दाखविला आहे. त्या प्रमाणें परमेश्वराचे सभोंवती असंख्य आहेत.

वर दाखविलेले सर्वांत मोठें ध्रुव. त्याहून लहान सूर्य. त्याप्रमाणें लहान ते ग्रह आहेत. त्याहून लहान ते उपग्रह.

# श्री परमेश्वर ज्ञानदर्शन.

किंवा

# हिंदु धर्ममत मंडण.

## प्रस्तावना.

परमेश्वरानें जग आपले कर्मणुकी करितां रचिलें अ-
सून नियमित काल पर्यंत त्याची धारणा न्यायानें आणि ने-
मानें व्हावी अशी व्यवस्था केली आहे हें प्रमाण सिध्द आ-
हे असें विचारी मनुष्यास सहज कळून येतें. या व्यवस्थेस
अनुसरून पृथ्वीवर मनुष्यांना सुख आणि ज्ञान प्राप्त हो-
ऊन त्यांची देह धारणा होण्या करितां म्हणजे त्यांचें अस्ति-
त्व राहण्या करितां नियम म्हणून धर्माची उत्पत्ती झाली आ-
हे. अर्थात धर्मशास्त्रवेत्ते शहाणे नीतिमान देशकालानुरूप
मनुष्यांच्या अवश्यकता म्हणजे जरूरी जाणणारे व वजनदार
असतात. व त्यांनीं केलेलीं शास्त्रें धारणेस अनुसरून अ-
सल्यामुळें परमेश्वरी साह्य त्यांस मिळून लोक तदनुसार
वागूंही लागतात. अशा महात्म्यांस देवावतार अथवा देवाचे
विशेष अंश मानल्यास वावगे नाहीं. या वरून असें सिध्द
जाहलें कीं धर्म व त्या संबधीं शास्त्रें अस्तित्वाला किंवा स्थि
तीला अनुसरून असून परमेश्वर ज्ञानप्राप्ती करून देण्या
सारखीं असलींच पाहिजेत आणि लोकांची वागणूकही
त्यांस अनुसरून असलीच पाहिजे. परंतु पुढें कालस्थिती

## परमेश्वर व सृष्टिरचना.







वर दोनच ध्रुव मंडळांचा नमूना दाखविला आहे. त्या प्रमाणें परमेश्वराचे सभोंवती असंख्य आहेत.

वर दाखविलेले सर्वांत मोठे ते ध्रुव. त्याहून लहान सूर्य. त्यापेक्षां लहान ते ग्रह आहेत. सर्वांत लहान ते उपग्रह.

# श्री परमेश्वर ज्ञानदर्शन.

किंवा

# हिंदु धर्ममत मंडण.

## प्रस्तावना.

परमेश्वरानें जग आपले कर्मणुकी करितां रचिलें असून नियमित काल पर्यंत त्याची धारणा न्यायानें आणि नेमानें व्हावी अशी व्यवस्था केली आहे हें प्रमाण सिध्द आहे असें विचारी मनुष्यास सहज कळून येतें. या व्यवस्थेस अनुसरून पृथ्वीवर मनुष्यांना सुख आणि ज्ञान प्राप्त होऊन त्यांची देह धारणा होण्या करितां म्हणजे त्यांचें अस्तित्व राहण्या करितां नियम म्हणून धर्माची उत्पत्ती झाली आहे. अर्थात धर्मशास्त्रवेत्ते शहाणे नीतिमान देशकालानुरूप मनुष्यांच्या अवश्यकता म्हणजे जरूरी जाणणारे व वजनदार असतात. व त्यांनीं केलेलीं शास्त्रें धारणेस अनुसरून असल्यामुळें परमेश्वरी साह्य त्यांस मिळून लोक तदनुसार वागूंही लागतात. अशा महात्म्यांस देवावतार अथवा देवाचे विशेष अंश मानल्यास वावगे नाहीं. या वरून असें सिध्द जाहलें कीं धर्म व त्या संबधीं शास्त्रें अस्तित्वाला किंवा स्थितीला अनुसरून असून परमेश्वर ज्ञानप्राप्ती करून देण्या सारखी असलींच पाहिजेत आणि लोकांची वागणूकही त्यांस अनुसरून असलीच पाहिजे. परंतु पुढें कालस्थितीं

त बदल झाल्यामुळें म्हणा अगर दुसऱ्या कांहीं कारणांमु-
ळें म्हणा केव्हां केव्हां लोकांचें आचरण एक प्रकारचें व
पूर्वीचीं धर्मशास्त्रें दुसऱ्या प्रकारचीं अशी तऱ्हा होते. धारणा
अथवा स्थिती होण्याकरितां मनुष्यांचा मनाचा ओढा सदै
व देह रक्षण आणि देहसौख्य यांकडे असावा अशी त्यां-
ची रचनाच परमेश्वरानें केली आहे, तेव्हां मनुष्यें ज्या धर्मां-
त असतील त्या धर्म शास्त्रांच्या विरुध्द कधीं कधीं तीं आ-
पल्या सुखा करितां व सोयी करितां म्हणून, (धर्मशास्त्रें
कालस्थित्यनुरूप नसल्यास) थोडी बहुत वागूं लागलीं तर
त्यांत नवल नाहीं. कालपरत्वें लोकांच्या सुख पर्यवसायी
वर्तनांत आणि भिन्न स्थितीच्या वेळच्या धर्मशास्त्रांत फरक
पडण्याचा संभव असतोच. म्हणून धर्मशास्त्रें सदैव लो-
कांस सोईवार अशींच असावीं अथवा करावीं लागतात.
लोकांच्या विरुध्द वर्तनाचा परिणाम पुढें असा होतो कीं
धर्माचें वजन रहात नाहीं, पुष्कळ पंथ होतात, ऐक्य नाहीं-
सें होतें व त्या धर्माच्या लोकांस अनेक प्रकारचीं संकटें
व दुःखें, अपमान, पारतंत्र्य वगैरे भोगावीं लागतात. क-
धींकधीं तर लौकर सुधारणा न झाल्यास सर्वच धर्म लया-
स जाण्याची भीति असते. अशा वेळीं परमेश्वर कोणत्या
तरी रीतीनें आणि रूपानें जगतास्तित्वास अनुसरून मनु-
ष्य देह धारणचे, मनुष्यसुखाचे व आपल्या भक्तीचेमा-

र्गे स्थापित करितो अथवा करवितो व धर्माचा आणि लोक वर्तनाचा मेळ घालून देतो. परंतु यांत हें पक्के लक्षांत ठेविलें पाहिजे कीं अशावेळीं फक्त नीतीलाच उत्तेजन मिळून अनीतीचा उच्छेद होतो. अर्थात जगतास्तित्वास व परमेश्वर भक्तीस अनुसरून ज्या गोष्टी ती नीती आणि तद्विरुध्द ती अनीती.

आपल्या वेदोक्त म्हणजे हिंदुधर्माची वर सांगितल्या प्रकारची हल्लीं दशा झाली आहे हें पुढें मुख्य मुख्य गोष्टी दिल्या आहेत त्यां वरून दिसून येईल:-

१. आमचे कित्येक लोक परमेश्वर अस्तित्वच मानीत नाहींत.

२. नवीन शोधांमुळें कित्येकांस स्वर्ग, देव, शाक्तन, मूर्त्तिपूजा, पुनर्जन्म वगैरेंत कांहीं अर्थ नाहीं असें शटतें वते, हीं सर्व असत्य मानतात.

३. कोणी कोणी पुनर्विवाह लावूं लागले.

४. पाळण्यांत लग्नें होऊं लागलीं व कन्या विक्रय होण्या सारख्या लग्नांच्या चाली पडल्या.

५. काहीं कांहीं, यवन व म्लेन्छ देशीं जाऊं लागले.

६. विरुध्द शृंगार व चोरून अनाचार होऊं लागले.

७. स्पर्शा स्पर्शाची बाधा लोक कमी मानूं लागले.

८. खऱ्या साधू संतांचें महत्व कमी झालें.

९. व्रतें, उपोषणें, धर्माचरण आणि शास्त्रविधी यांचें महत्व कमी होत चाललें.

येणें प्रमाणें पुष्कळ प्रकार धर्मशास्त्राविरुध्द हल्लीं लोकाचरणांत आहेत. कालस्थितीस अनुसरून धर्मशास्त्रें नसल्याकारणानें व धर्मबंधनें रक्षणारी संस्था नसल्यामुळें असें होत आहे. या गोष्टीस लौकर कांहींतरी उपाय न झाल्यास परिणाम दुःखप्रद होईल. लोकांची धर्मश्रध्दा कमी होत गेल्यामुळें व लोकांचें वर्तन धर्मविरुध्द म्हणजे धर्मशास्त्राविरुध्द अधिकाधिक होतगेल्यामुळें धर्मानुयाऱ्यांची संख्या व ऐक्य कमी होऊन धर्म लयास जाण्याचा व तदनुयाऱ्यांस दुःख होण्याचा संभव आहे. तशांत निरनिराळ्या जातींच्या मनुष्यांच्या धर्मविरुध्द संगमामुळें जातींची संख्या वाढत चालली आणि त्यामुळें ऐक्य जास्तच कमी होत चाललें आहे. आपण आपल्या सुखांत दंग राहून या विषयीं विचार आणि यांस कांहीं उपाय न केल्यास पुढील संतती आपणांस " आमचे पूर्वज अज्ञान होते " असें म्हणतील याची आपणास अवश्य आठवण ठेविली पाहिजे. आपल्या पूर्वजांस नांवें ठेवणाऱ्या हल्लींच्या मनुष्यांनीं तर हें अगदीं विसरतां कामा नये. आधीच जातीविरोध व पंथविरोध यांनीं ऐक्य नाहींसें जाहलें आहे आणि आतां

सुधारा पंथांनीं तर तें जास्त नाहींसें होऊन धर्मच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

विचार करून पहातां या कामीं प्रथमतः परमेश्वर अस्तित्व, सृष्टीरचना, आत्कन, पापपुण्य, पुनर्जन्म, मूर्तिपुजा, सर्व साहित्यासह आत्मा, इच्छा अगर बुद्धि, नीति, भक्तिमार्ग वगैरे सत्य आणि निःपक्षपात प्रमाणांनीं व अनुमानांनीं सुधारणा पंथाची व एकंदर जगाची खात्री होईल अशा प्रकारें संस्थापित झालीं पाहिजेत. म्हणजे अशा रीतीनें आपल्या धर्ममतांचें प्रतिपादन झालें पाहिजे, कारण धर्मशास्त्रें व पुराणोक्त गोष्टी न मानणारांस त्यांचे आधार दाखविणें निरुपयोगी आहे. सबब सत्यानुमानें व प्रत्यक्ष प्रमाणेंच पुढें केलीं पाहिजेत. सदहू गोष्टी स्थापित करणारीं मतें कोणत्याही धर्माच्या अगर पंथाच्या लोकांस ग्राह्य आणि नवीन (अर्वाचीन) शोधान्वयें हिंदुधर्मशास्त्र मतांचें सत्यत्व होईल तितकें अचीक दाखविणारीं असलीं पाहिजेत. आणि धर्म बंधारण ही पाहिजे, तरच लोक धर्माला अथवा धर्मशास्त्रांना अनुसरून वागतील आणि त्या शास्त्रांचें वर्चस्व राहून सर्व धर्मानुयायांचें हित होईल. परंतु हें ही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं कालस्थित्यनुरूप, मतें पसंत झाल्यावर, धर्मसुधारणा ही झाली पाहिजे तरच धर्मरक्षक संस्थेचा उपयोग होऊन ऐक्य व धर्मसंख्या रक्षण

होईल. कालांतरानें अकस्मातामुळें अथवा मतलबी, दुष्ट आणि कपटी लोकांच्या कर्तुत्वामुळें मूळशास्त्रांत व मतांत कमजास्तपणा होण्याचा व कित्येक मुळींच नष्ट होण्याचा संभव असतो, सबब कालस्थितीस अनुसरून धर्मशास्त्रांत सोईवार सुधारणा करण्यास कांहीं हरकत नाहीं. अशा प्रकारची थोडीशी सुधारणा न केल्यास बिघाड किती होतो याचा चांगला विचार केला पाहिजे व प्रौढ विचारानें आणि मोकळ्या मनानें पूर्वीच्यांचा वृथाभिमान सोडला पाहिजे. पूर्वी शास्त्रें झालीं त्या वेळचा काळ आणि हल्लींचा काळ यांत महदंतर आहे. पूर्वी अन्यधर्मी राजे नव्हते; सर्वत्र पसरलेल्या आगगाड्या; आगबोटी; तारायंत्रें; अनेक प्रकारचीं यंत्रें वगैरे नव्हतीं. मार्ग निष्कंटक करून चालणें अर्थात चांगलें. सोईवार धर्ममतांस अनुसरून लोक आपल्या आपणच वागतात व गैर सोईस अनुसरून त्यांस वागण्यास लावणें दुर्घट असतें हें पक्कें ध्यानांत वागविलें पाहिजे. धर्मांत थोडीशी सुधारणा करणें कित्येकांस आवडणार नाहीं; पण विचारांतीं त्यांत कांहीं गैर नाहीं असें सर्वांस खचीत वाटेल. लोकांस आवडत्या आणि त्यांच्या आचरणांत प्रत्यक्ष असणाऱ्या त्यांस सोईवार अशा गोष्टी; जसें महार धेडासोबत आगगाडींत (कधींकधीं तर कराळाचे घेऊनही) बसणें, आग-

गाडींत पाणीपिणें, नद्यांचें पाणीपिणें, यवन व म्लेंच्छ देशी जाणें, हल्ली त्या डाक्तरच्या हांतचे अर्क व पाणीमिश्रीत औषध घेणें, यवन व म्लेंच्छ यांस वस्त्रांसह शिवणें व तसेंच पाणीपिणें, जोड्यासह पाणीपिणें व फराळ करणें, प्रवासांत सोंवळ्या ओंवळ्याचा प्रकार संकोचित् करणें, ज्ञातीचा संबंध मनांत न आणतां आचरणास अनुसरून दुसऱ्याशीं वागणें, खालच्या पायरीच्या जातींच्या लोकांनीं उंच जाती प्रमाणें वागणें, इत्यादि पुष्कळ प्रकार आहेत. अशा गोष्टी शास्त्रानें धर्मास अनुसरून आहेत म्हणून, निदान पर्यायानें तरी म्हणणें, यांत काय बिघडणार आहे? पुढील नुकसाना बद्दल आपण आतांच नकोका विचार करावयाला? प्रत्यक्ष आचरणांतील गोष्टी शास्त्रोक्त आहेत असें न म्हटल्यास शास्त्रांची किंमत ती काय रहाणार? आपल्या पुढील पिढ्यांचे आपण, धर्मनष्टतेचा व धर्मोपमानाचा प्रकार चालू ठेवून, जाणूनबुजून नुकसान करणें किती चमत्कारिक आहे! अस्तु.

धर्म बंधारणाची म्हणजे संस्थेची कष्टसाध्य गोष्ट तूर्त बाजूस ठेवून मतें स्थापित करण्याची गोष्ट आपण पहिल्यानें हातीं घेऊं. इतक्यांत खरीं व सोईवार मतें कोणतीं तें परमेश्वरानेंही कृपाळू होऊन दृश्य केलें आहे.

"श्रीपरमेश्वर ज्ञानदर्शन किंवा हिंदुधर्ममतमंडण" ग्रंथ ज्याची ही प्रस्तावना आहे त्यांत अशा प्रकारचीं मतें प्रविष्ट केलीं असून त्यां पासून पहिला हेतु नडीस जाण्यासारखा आहे. त्यांत सांगितलेलीं मतें कोणत्याही धर्मशास्त्रांत पूर्वीं सांगितलेली असोत अगर नसोत तीं खरीं व प्रमाणसिध्द आणि सद्यस्थितीस सुग्राह्य आहेत असें प्रत्येक निःपक्षपाती विचारी मनुष्यांस कळून येण्यासारखें आहे. माझ्या सारख्या अप्रसिध्द मनुष्याकडून त्यांची प्रसिध्दी होत आहे म्हणून उपेक्षा होणार नाहीं अशी आशा आहे. त्यांच्या सत्यत्वा विषयीं विचार करून पाहणें व अनुभव घेऊन पाहणें सूज्ञांकडे आहे. हा ग्रंथ नवीन शोधास अनुसरून म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञानशास्त्र, खगोलशास्त्र वगैरेस अनुसरून वेदोक्त धर्माच्या बहुतेक मुख्य मतांचें सत्यत्व व महत्व दाखवीत आहे. जसें परमेश्वर अस्तित्व, स्वर्ग व देव, प्रळय, प्राक्तन, मूर्तिपूजा, पुनर्जन्म व कित्येक नीतीचे प्रकार; जसें उद्योग, स्वच्छता, निश्चय, खरी दयावगैरे; या सर्व गोष्टी सदरहू शास्त्रांवरून व प्रत्यक्ष अनुभवावरून निःपक्षपातानें सत्यानुमान केल्यास ग्रंथांत सांगितल्या प्रमाणेंच आहेत अशी खात्री होण्यासारखें आहे. ग्रंथा पासून या मुळें नव्या व जुन्या मतांचा

मिळाफ होणार आहे, तेव्हां या वेळीं या ग्रंथाच्या प्रसिद्धीची किती अवश्यकता आहे हें कळोन येईल. धर्म महत्व वरून एकमत झाल्याशिवाय धर्म सुधारणा होणार नाहीं आणि धर्म सुधारणा झाल्या शिवाय खरें सुख मिळणार नाहीं हें विसरतां कामा नये. याची प्रसिध्दी म्हणजे धर्म संस्थापनेचा पाया आहे व शिवाय या पासून ज्ञान व परमेश्वर प्राप्ती होणार आहे; अनुभव घेणारे मात्र तयार झाले पाहिजेत.

हा सारांशरूप म्हणजे बीजरूप ग्रंथ असल्यामुळें त्यांतील गोष्टींचीं, प्रमाणें देऊन स्पष्टीकरण करणें व ग्रंथाचा भावार्थ समजण्यास जास्त सुलभ करणें अत्यावश्यक आहे. परंतु तें काम उरकण्यास मी आतांच सिध्द नाहीं व त्या करितां ग्रंथ प्रसिध्दी थांबवून ठेविली पाहिजे असें ही नाहीं कारण बहुतेक भाग निःपक्षपाती विद्वानांस समजण्या सारखा आहे. तथापि त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचें खालीं थोडक्यांत साधारण विवेचन करितां:—

**परमेश्वर अस्तित्व कसें सिध्द होतें**—ज्या तत्वास पृथक्करणानें अगर दुसऱ्या कशानेंही नष्ट करितां येत नाहीं अगर जेथें कार्य कारण भाव नाहीं असें जें सज्ञानतत्व तो परमेश्वर. ध्यानानें व योग साधनानें ज्याचें दर्शन होतें व ज्याच्या साक्षात्कारामुळें दुर्घट गोष्ट

घडून येतें तो परमेश्वर. अकस्मात हा परमेश्वराचा नित्य साक्षात्कार होय. शिवाय सृष्टिरचनेंत जो सुंदरपणा, चातुर्य व सामर्थ्य दिसून येतें त्यांवरून मार्मिक व विचारी मनुष्यास वाटलेंच पाहिजे कीं ही रचना करण्याला व चालविण्याला कोणी तरी मोठा आनंदी, पूर्ण ज्ञानी, सर्व शक्तिमान् व त्रिगुणात्मक ( उत्पत्ति-स्थिति-लयकारक ) असा असलाच पाहिजे. हौसी आणि आनंदी उत्पन्नकर्ता असल्याशिवायं शोभा कशी उत्पन्न होईल? तऱ्हतऱ्हेच्या आकाराचे व रंगाचे पदार्थ आणि प्राणी; त्यांचें चालनचलन व व्यवस्था आणि ज्ञानतंतू सारख्या चमत्कारिक सूक्ष्मावयवांची रचना हीं सर्व त्याचे अस्तित्वाचीं प्रमाणें आहेत. षड्गुणमय आत्मा, इच्छा, विचार, स्मृति, आनंद आणि खेदाची उत्पत्ति सज्ञान कर्त्याविना कशी होईल?

सृष्टिरचना— रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, खगोलशास्त्र, वगैरे अलीकडील शास्त्रांवरून ग्रंथांतील रचनें संबंधी भाग प्रमाणीभूत आहे. यापैकीं कांहीं अंश जो सदरहू शास्त्रांबाहेरील आहे त्याची सत्यता परमेश्वराशिवाय दाखविणार अथवा कळविणार तूर्त कोणी नाहीं. पुढें जसजसे शोध लागत जातील तसतशी त्यां पैकीं बऱ्याच भागांविष-

थीं खात्री होणार आहे. स्वर्ग व प्रळय हिंदूंच्या व इतर धर्मशास्त्रांत सांगितलेले आहेतच.

**बुद्धि प्राक्तन आणि उद्योग**— इंद्रियें व अवयव उद्योगा करितां आहेत. चांगला म्हणजे जगत्स्थितिरक्षक ( अर्थात् स्वदेह रक्षकही ) जो उद्योग तें पुण्य आणि त्याचें उलट तें पाप. पुण्याचें फळ सुख आणि आनंद, पापाचें फळ दुःख आणि खेद. उद्योगाचें फळ पोत्कृत्व संचय तें प्राक्तन. बुद्धि (विचार) व स्मृति हीं ज्ञानतंतूंत राहून प्राणाचें कार्य करितात व त्याचा संबंध प्राक्तनरूप मस्तकांतील देव अंशाशीं जोडतात, त्या मुळें देव आत्म्याच्या विचारास जरूर तेव्हां कर्मानुसार फिरवितो, त्या मुळें प्राणी कधीं कधीं जाणून बुजून व दुसरे वर्जे करीत असतांही विरुध्दाचरण करितो आणि सुखदुःखाचे अगांतूक प्रसंग येतात. कर्मानुसार स्मृति आणि बुद्धि म्हणजे विचारशक्ति हीं कमजास्त असतात व सुखी अगर दुःखी स्थितींत पूर्वजन्मही तद्नुसारच मिळतो. प्राणाचा स्वभावही प्राक्तनानुसार असतो म्हणजे त्याचे जवळील षड्गुणांचें मानही प्राक्तनानुसार कमजास्त उपजतच असतें. परमेश्वर न्यायाशिवाय उगीच कोणालाही कमजास्त सुखदुःखवगुण देत असेल असें एकंदर सृष्टिरचनेंत त्याची नीति व

नियमितपणा जो दिसून येतो त्यावरून संभवत नाहीं. तेव्हां उद्योगावरून प्रत्येक प्राण्याला प्राक्तन म्हणजे कर्म असलेंच पाहिजे. पापपुण्याचा संबंध मनुष्यांस मात्र आहे, इतर प्राण्यांस फक्त भोक्तृत्व. यावरून बुध्दि प्राणाच्या स्वाधीन असून तिच्यांत फेरफार मात्र देव अगर प्राक्तन जरूर त्या प्रमाणें करूं शकतें. प्राक्तन उद्योगानें बनतें व उद्योगही प्राणाचे अधीन आहे. म्हणून फळें भोगणारा अर्थात् प्राणच होय. उद्योग तर अवश्य केलाच पाहिजे, नाहींतर सर्व नाश व अत्यंत दुःख एकदम त्वरेनें होतें हें उघड आहे, कारण उद्योग न करणें म्हणजे परमेश्वरी इच्छा मोडणें होय. तो न केल्यास सर्व पुण्य एकदम दग्ध होतें. या सर्वांस आधार हिंदुधर्म मतांत बराच असून या संबंधीं उदाहरणें चौकस मनुष्यास पृथ्वीतलावर नित्यशः हजारों आढळून येणारीं आहेत. विचार करा. चांगल्याचा चांगला व वाईटाचा वाईट असा परिणाम उलट प्रयत्न करीत असतांही कां होतो? शहाणा व जपून चालणारा दुःखी आणि तसा न वागणारा सुखी कां असावा? कमावणारा आपणच पुढें गमावतो व गमवणारासही अगांतुक मिळतें तें कां? प्रयत्नाच्या सिध्दी विषयीं कितीही जपलें

तरी खात्री असतेच असें कां नाहीं? चांगल्या कुळांत आणि शिक्षणांत वाईट व वाईट कुळांत आणि शिक्षणांत चांगलीं मुलें कां निपजतात? मनुष्यास अनुकूळ आणि प्रतिकूळ काळ कां असतो? सर्व मनुष्यें अगर प्राणी सारख्या स्वभावाचे कां नसतात म्हणजे षड्रिपूंचे मान सर्वांत सारखें कां असत नाहीं? अज्ञान, अव्यवस्थित, आणि अस्वच्छ दीर्घायुष्यीं व त्याचे उलट ते अल्पायुष्यीं अशीं उदाहरणें कां घडून यावीं? बुद्धि मनुष्याधीन असून प्राक्तनाच्या अधिकारांत असल्याशिवायव उद्योग मनुष्याचे स्वाधीन असून फलप्राप्ती प्राक्तनाधीन असल्याशिवाय असें कधींही होणार नाहीं.

देव आणि स्वर्ग— रचनेच्या उत्पत्ति, स्थिति आणि लया विषयीं सन्याय व्यवस्था ठेवण्यास परमेश्वर अंश अनेक देव असलेच पाहिजेत; जसें राज्य व्यवस्था अगर एखादा कारखाना चालविण्यास एकाहून एक वरिष्ट अधिकारी असावेच लागतात. शिवाय स्वर्गांचे अस्तित्वा विषयीं सर्व धर्मांचें मत अनुकूळच आहे.

मूर्तिपूजा— परमेश्वर सर्व साक्षी व सर्वव्यापी आहे; तो निश्चया प्रमाणें व भावा प्रमाणें पाहिजे तेथें संचार करून नीति आणि नियमाची फलप्राप्ति देतो, हें भक्तास अनुभवसिध्द आहे. व पाहिजे त्याच्या अनु-

नवांस येण्या सारखें आहे. शिवाय मूर्ति ह्या पराक्रमी व सद्गुणी व्यक्तींच्या असल्यामुळें त्यांचें वर्तन लोकांस अनुकरणीय होतें. परमेश्वर साकार आहे निराकार नाहीं निराकारापासून उत्पत्ति, स्थिति आणि लय कशीं होतील? साकाराचें ध्यान मूर्तिच्या मार्गानें करितां येतें.

पुनर्जन्म— पापपुण्याचें भोक्तृत्व बाकी राहिल्यास पुनर्जन्म घेऊन भोगावें लागतें; उदाहरण कधीं कधीं मूळजन्मच सुखी अगर दुःखी स्थितींतमिळतो व आयुष्यमर्यादा अनियमित असतें. कधींकधीं पूर्वजन्मीच्या शारीरिक खुणांही पुढील जन्मीं असतात व गतजन्माचें ज्ञान असतें.

सदर्हू वरून परमेश्वर स्फुर्तिरूप ग्रंथांतील शब्दांचें महत्व व सत्यत्व कळून येईल. अतीसूक्ष्म ज्ञान तंतू मृत्यू बरोबर विरघळून जात असल्यामुळें त्यां विषयीं व ग्रंथांतील इतर कित्येक गोष्टीं विषयीं आधार देणे असंभवनीय आहे, तथापि तर्कानें म्हणजे अनुमानानें त्यां विषयीं खात्री होण्या सारखी आहे, मात्र निःपक्ष पातानें खोल विचार केला पाहिजे. सारांश ग्रंथा पासून नव्या व जुन्या मतांचें एकीकरण होऊन बहुतेक हिंदुधर्ममतें संस्थापित होत आहेत आणि खरीं मतें सर्वांस कळून त्या मुळें पुढें धर्मसुधारणा

होऊन ज्ञान व सुख प्राप्ती होणार आहे.

आपला हल्लीं प्रचारांत असलेला हिंदुधर्म म्हणजे वेदोक्त धर्म तूर्त कशा स्थितींत आहे या विषयीं खोल विचार केला असतां फार वाईट वाटतें. वर या बद्दल थोडेसें लिहिलेंच आहे, तथापि आपण या विषयीं पुनः आणखी कांहीं जास्त विचार करूं या. हा धर्म चालू असणाऱ्या या हिंदुस्थान देशांत अन्य धर्मी लोकांची सत्ता व वर्चस्व कित्येक वेळां बहुत काळ राहिल्यामुळें धर्मशास्त्रांत फेर बदल झाले व कित्येक मुळींच नष्ट झालीं व धर्माच्या लोकांवर घाले पडून पुष्कळ मारले व बाटविले गेले. राजमताला अनुसरून कित्येक नवीन रुढी व चाली धर्मांत सामील झाल्या व कित्येक शास्त्रमतें एका बाजूस राहून लोक शास्त्रांचे विरुध्द वागूं लागले. तशांत काल मानाला अनुसरून लोक अल्पवयीं व अशक्त होत चालले, आणि ताबेदारीमुळें तर ते विशेष निःसत्व होत चालले; त्या मुळें लोकांना अवघड व आपले वंशजांस देशाबाहेर जाण्याचें कारणच पडणार नाहीं आणि बाहेरून कोणीही आंत येणार नाहीं अशा कल्पनेनें केलेल्या शास्त्रांस अनुसरून वागणें सोडून द्यावें लागलें व तशा वागणुकींचा फारसा प्रतिबंध नसल्यामुळें हल्लींच्या वेळींतर अशा वागणारांची संख्या दिवसें दिवस झपाट्यानें वाढत आहे आणि त्या मुळें धर्मानुया यांचें ऐक्य व धर्माभि-

मान नाहिसे होत आहेत व तिकडे अन्यधर्मी लोक आणि अन्यधर्मोपदेशक वगैरे धर्मांची संख्या व वजन उतरण्याला प्रयत्न करीत आहेत. अशा वेळीं धर्म मतांचें सत्यत्व प्रतिपादन होऊन आणि धर्मांत जरूर त्या सुधारणा त्वरेनें होऊन व धर्माचें महत्त्व वाढून ऐक्य न झाल्यास धर्मानुया यांची संख्या कमी होण्याचा व त्यामुळें अतोनात दुःख होण्याचा संभव आहे. हा, आपलें सुख व धर्म दाहक अग्नि, उपायउदकानें आपण आतांच शांत न केल्यास ज्या लाडक्या मुलांबाळांस आपण हल्लीं प्रीतीनें पाळीत आहों त्यांच्यादुःखास पुढें कारण होणार आहे हें पक्कें लक्षांत वागविलें पाहिजे आणि शक्त्यनुसार या कामीं हिंदूंनीं झटलेंच पाहिजे. पंथ आणि ज्ञाती भेद कसे व कितीही असोत आणि त्यांचा परस्पर विरोध असोवा नसो मुख्यमुख्य धर्ममतांत तरी एक वाक्यता व एकवाक्यता रक्षणारी संस्था लोकांत असली पाहिजे त्या शिवाय सुख होणार नाहीं. मनुष्यें व इतर सर्व प्राण्यांविषयीं या जगांत साधारण असा नियम आहे कीं सामर्थ्य संख्येवर अवलंबून असतें म्हणजे जितकी संख्या आधीक तितकें सामर्थ्य जास्त. कोणत्याही धर्माची लोकसंख्या म्हणजे त्या धर्मास अनुसरून वागणाऱ्या व त्या धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या मनुष्यांची संख्या. प्रत्यक्ष सत्ता

व सौख्य हीं जरी अन्य ठिकाणीं असलीं तरी तीं गुप्त रुपानें तरी संस्थेजवळ म्हणजे सामर्थ्या जवळच असतात हें उघड आहे. सर्व प्रकारचें सौख्य संस्था सामर्थ्यावर अवलंबून असतें हें विचार केला असतां स्पष्ट करून येण्यासारखें आहे. धर्म संस्था म्हणजे धर्म समाज नांवाला असून उपयोग नाहीं, तो एकमताचा असला पाहिजे. त्यांत निरनिराळे पंथ अगर ज्ञाती असल्या तरी एकंदर धर्म संबंधांत सर्वांचें ऐक्य असलेंच पाहिजे, तरच त्यास एक समाज म्हणतां येईल व त्याचें वजन राहून तो समाज आपल्या स्वतःच्या सुखास व रक्षणास कारण होईल. निरनिराळ्या प्रांताचे, पंथाचे व ज्ञातीचे आचार विचार पृथक असले तरी एकंदर धर्म संबंधांत सर्वांची एक वाक्यता असली म्हणजे झालें. अशा प्रकारची एक वाक्यता होण्याला वर सांगितल्या प्रमाणें कोणत्याही पंथाला अगर ज्ञातीला हरकत नाहीं व नव्या म्हणजे सुधारलेल्या अगर मुख्य धर्ममतें न मानणाऱ्या आणि जुन्या म्हणजे अलीकडील शास्त्रीय वगैरे शोधावरून मिथ्या दिसत असलेल्या गोष्टी मानणाऱ्या लोकांस पसंत पडून त्यांचें एकीकरण होईल अशा प्रकारें धर्म मतांचें प्रतिपादन व धर्म सुधारणा झाली पाहिजे. सुधारणा होण्याला व एकीकरण होण्याला प्रथमतः धर्ममतांची सत्यता स्थापि

त झाली पाहिजे व सुधारणा कशा प्रकारच्या पाहिजेत त्याची परिस्फुरता झाली पाहिजे आणि मागाहून एक धर्मसभारूपी सर्व देशभर संस्था स्थापन झाली पाहिजे. अर्थात पहिल्यानें पहिलें काम हातीं धरलें पाहिजे. सदहू काम " श्रीपरमेश्वर ज्ञानदर्शन किंवा हिंदुधर्ममतमंडण" ग्रंथाचे प्रसिध्दीनें तडीस जाणार आहे, सबब देशांतील सर्व भाषेंत त्याची प्रसिध्दी होईल तितक्या लौकर करविण्या विषयीं झटणें प्रत्येक हिंदु म्हणविणारानें काम आहे.

धर्मसुधारणा व धर्म ऐक्य यां पासून पुढील पिढ्यांचें दुःख चुकून त्या सर्वांस एकी पासून व सद्वर्तनापासून होणारें सुख मिळणार असल्यामुळें व सद्य कालीं ही प्रसंगीं त्या पासून मोठाले दुर्दशेचे व दुःखाचे प्रसंग चुकणार असल्यामुळें हें काम मोठ्या परोपकाराचें आहे आणि परोपकार करणें हें हरएक मनुष्याचें कर्तव्यकर्म होय. प्रत्येकांचे जगांतील वास्तव्य अगदीं अशाश्वतीचें असल्यामुळें त्याची संतती, संपत्ती वगैरे सर्व अशाश्वत आहे. येथें कितीही सुख भोगलें अगर जोडून ठेविलें तरी अंत समयीं निरुपायानें त्यां सर्वांस सोडून जावें लागतें. चार दिवस एकाद्या ठिकाणीं राहून जावें लागलें असतां निघते वेळीं वाईट वाटतें, मग आपलीं

प्रिय मनुष्यें व आपली सर्व प्रिय चीजवस्त पुनः दिसण्या-
ची आशा नाहीं अशा रीतीनें सोडून जातांनां मनुष्यास
अथवा त्याचे प्राणास कसें वाटत असेल! अरेरे, अशा
वेळीं केलेलें सुकृत म्हणजे परोपकार मात्र जिवलग
मित्रा प्रमाणें पातक फळरूप शत्रूपासून रक्षण करण्या-
करितां तीव्र शस्त्र रुपानें प्राणाच्या जवळ रहातात. दुसरा
अशावेळीं कसलाही उपयोग होत नाहीं व सर्व पसारा आ-
णि माया मिथ्या ठरते. म्हणून मनुष्यानें ऐहिक सुखा-
वरच लंपट न रहातां, येथील अस्तित्वा करितां तें जरी
मिळविलें पाहिजेच, तरी तें मिळवीत असून त्यांतच म-
रणा नंतरच्या स्थितीचाही आठवणीनें विचार ठेविला पा-
हिजे व करवतील तितके खरे परोपकार व सद्वर्तन केलें
पाहिजे. एका मनुष्यावर उपकार करण्यापेक्षां अधिकां-
वर करणें अर्थात चांगलें. ज्यांवर उपकार करावयाचे
त्या लोकांची संख्या जितकी अधिक असेल तितकें
अर्थात सुकृत अगर पुण्य विशेष घडतें. यावरून प्र-
थमच्या या मोठ्या लोक संख्येच्या कल्याणाकरितां ग्रं-
थ प्रसिध्द करावयाचे कामीं म्हणजे मुख्य धर्म मतांचें
अगर धर्माचारांचें प्रतिपादन करण्याचें कामीं अशाश्व-
त असें जें तन, मन आणि धन हें शक्त्यनुसार, परमे-
श्वर साक्षीनें व इमानानें, प्रत्येक हिंदुनें अर्पण केलें-

चं पाहिजे. या योगें परमेश्वररूप त्याची आराध्य दैवतें संतुष्ट होतील, नाहींतर कोपायमान होऊन पुढें सर्व दुःखच दुःख होऊन जाईल व सर्व दोष मुख्यत्वें करून हल्लींच्या पुढारी लोकांवर राहील. सध्यां आपल्या धर्म समाजाचें, हित करण्यास झटण्याचे परोपकारा प्रमाणें मोठा व महत्वाचा परोपकार व अवश्य कर्तव्य दुसरें कोणतेंच नाहीं. तें पुढील अनर्थ मनांत आणून प्रत्येकानें शक्त्यनुसार करून देवास संतुष्ट केलें पाहिजे. निरनिराळ्या जातींनीं व पंथांनीं आपसांत भांडणाची ही वेळ नसून प्रत्येकानें एकंदर धर्म सुधारणा करण्यास व ऐक्य करण्यास झटले पाहिजे. म्हणजे कलाकौशल्य व व्यापारोद्योगाची वृध्दी अगदीं सुलभ जाईल म्हणून हें काम पहिल्यानें झालें पाहिजे.

असाच आणखी कांहीं वर्षें इंग्रजी विद्येचा जर फैलाव असेल तर सुधारा—मार्मिक पणानें पाहिल्यास असुधारा अथवा अविचार—पंथ सर्वत्र पसरेल. जर कां एकदां त्याची मजल गांवढे गांवापर्यंत जाऊन पोंचली, तरमग त्याचा उच्छेद करणें दुर्घट होईल. ज्या आपल्या सनातन धर्माच्या लोकांनीं पूर्वीं पृथ्वीवर दिग्विजय केला होता, ज्यांनीं बौध्य धर्माचा पराजय करून आपल्या धर्माचें संस्थापन केलें, तरवारीचे जोरानें ध-

मे विटंबना झाली असतां त्याच जोरानें ज्यांनीं पुनः धर्म वर्चस्व स्थापन केलें, त्यांचे वंशज आपण आपल्या धर्माचा हल्लीं उपहास होत असतां व धर्म लयास जाण्याच्या पंथावर असतां म्हणजे लोक त्याचे मतांस व आचारविचारास "झूट" म्हणून म्हणत असतां उगीच बसणें व आपल्या धर्माचें महत्व रक्षण न करणें या सारखी शरमेची दुसरी गोष्ट कोणतीच नाहीं! आपली ईर्षा आणि अभिमान काय झाली? आपण या वेळीं स्वस्थ राहिल्यास कसें होईल? कित्येक भित्रे, अज्ञान व अनिश्चयी लोक म्हणतील कीं हें काम मोठें दुर्घट आहे; ज्ञाती व पंथविरोधामुळें तें तडीस जाणार नाहीं, पण हा केवळ भ्याडपणा असून आपल्या शिलाला म्हणजे बीजाला लाजीवणारा आहे हें पक्कें समजावें. निश्चयानें, शहाणपणानें, आणि प्रयत्नानें कांहींच दुर्घट नाहीं! ही गोष्ट अनुभवानें चांगली कळोन आली आहे, येत आहे व येईल असा सच्चिदानंद प्रभूचा आशिर्वाद आहे. तरी बावानो, धीर करा, शिलाला बट्टा लावूं नका आणि या सुसाध्य उपायानें एकमतें अनुपमेय फायदा करून घ्या. आपल्या उत्तम, देशस्थितीस शोभणाऱ्या व सर्वलोक प्रशंसा पात्र धर्माचा उपहास अगर अपमान सहन करणें म्हणजे आपल्या पुरुषत्वास, बीजास आणि अकलेस **मोठें** लांच्छन आहे!

गैर समजोसन्न सुधारणापंथ जो धर्माचें मातेरें करण्यास उभा राहिला आहे त्यास ह्मणून पाडणें व धर्मरक्षण करून धर्म समाज वाढविणें ही गोष्ट दृढ प्रयत्नांनीं खचीत सुसाध्य आहे. शेवटीं या कामीं सर्व बांधव या ग्रंथाचा बहुमान करून पुढील व्यवस्था करण्यास मला उत्तेजन देतील अशी आशा बाळगून मी ही फार वाढलेली प्रस्तावना येथेंच पुरी करितों.

वैवस्वत.

# ॥ श्रीपरमेश्वरज्ञानदर्शन ॥
किंवा
# ॥ हिंदुधर्ममतमंडण भा. १ ॥

॥ श्रीपरमेश्वर ज्ञानदर्शन किंवा हिंदुधर्ममतमंडण ॥



॥१॥ ॐ परमेश्वरायनमः ॥ अनंतायनमः ॥ परमात्मनेनमः ॥ सच्चिदानंदायन-
मः ॥ विश्वव्यापकायनमः ॥ ध्यान आणिस्तुति अपार ॥ करितांप्रसन्नझा-
लासर्वेश्वर ॥ म्हणेऐकेमहागुह्यज्ञानआजवर ॥ अप्रसिध्दजेंहोतें ॥१॥ तेंज्ञान-
समजण्यासारिखी ॥ आजवर स्थितीनव्हतीमृत्यूलोकीं ॥ आतांअनेकशोधामुळें
लोकीं ॥ ज्ञानमार्गखुलला ॥२॥ सहस्त्रावधीरवीइतुकेंप्रकाशतेज ॥ त्यांतूनीसहस्त्रमे-
घाऐसाध्वनिराज ॥ उमटे, आंतस्वरुपें पुरुषप्रकृती चीं नेजःपुंज ॥ नलक्षवेनेत्रांनीं
॥३॥ पुढतीतेजांतुनीध्वनीहोत ॥ मीऐकेसावचीत्त ॥ सज्जनहोश्रवणकरात्वरि-
त ॥ कायअच्युतबोलिला ॥४॥ वेदोक्त धर्मजेशीगंगाजाण ॥ तो आतांझालाम-
लीण ॥ तूंकालस्थितीनुरूपपूर्ण ॥ त्यातेगौरवीमम आज्ञें ॥५॥ सध्दर्माचाउप-
हासहोत ॥ पाखंडेंमातलींबहुत ॥ खंडणकरूनत्यांचेंत्वरीत ॥ आद्यधर्मासंस्था- ॥१॥

पी ॥ ६ ॥ धर्मविजासहगूढज्ञान ॥ साराषेंतुजइशीसांगनोसुजाण ॥ ज्याच्याश्रवणें
मननेंनिद्ध्यासेंपूर्ण ॥ पाविजेममपदां ॥ ७ ॥ याअनंतपोकळींत ॥ सदांभरलोंअ
सेमीनिश्चित ॥ ह्यिचीविस्तीर्णतामनुष्या अगण्यसत्य ॥ यापृथ्वीगृहावरी ॥ ८ ॥
इशींनसेंवररवालीं ॥ ममतत्वेंसर्वव्यापिली ॥ त्यातत्वाचींदोनअंगेंअसतीवहिली ॥
सत्वआणिसामर्थ्य ॥ ९ ॥ बनणारआणिबनविणारसाची ॥ दोतत्वेंपरीएकरू-
पपरियेसी ॥ नचलेकांहींपृथक्करणादीक्रियांची ॥ शक्तीतेंममरूप ॥ १० ॥
सत्वतेंचेतनाचेतनमयब्रम्हतत्वजाण ॥ सामर्थ्यहोयगतीज्ञानमयपरब्रम्हत
त्वपूर्ण ॥ एकासंगेंएकरहाती,भिन्न ॥ नहोतीकदांकाळीं ॥ ११ ॥ अतीसीतमयअं
धार ॥ अतीसूक्ष्मप्राणीमयजैसांअचलसमीर ॥ सजीवपरीगतीनसेसाचार ॥
तयाप्राण्याइशीं ॥ १२ ॥ ऐशाब्रम्हमयपोकळीचामध्यजाण ॥ तोब्रम्हाचापरमदा-
र्थ्यविंदूपूर्ण ॥ तेंपरब्रम्हाचेंमुरव्यस्थान ॥ अमितसामर्थ्यजयाच्वें ॥ १३ ॥

प. तोमीप्रत्यक्षभगवान ॥माझेंज्ञानसांगतोतुजलागून॥ चित्तदेईसावधान॥श्रोत्रें
॥२॥ द्रियेंऐकावीं॥१४॥रंगहीनसतेजवर्तूळआकृतीमूळमाझी॥त्यावरीअछादनाकृती
मनुष्याची॥वर्तूळजैसेंशुभ्रलिंग,ॐकारध्वनीची॥ गर्जनाभयंकर॥१५॥म
नुष्यप्राणहीलिंगरूपअसे॥देहतोज्ञानोद्योगाकरतांवसे॥ मनुष्याकृतींतभाव
नाहोतसे॥ममरूपाची॥१६॥ अतीसीततेपासून॥ उष्णताउत्पन्नहोयजाण॥
अंधारापासूनप्रकाशपूर्ण॥अतीसजिवापासोनिसजीवज्ञानशक्ती॥१७॥याम्
ळेंमाझेंमुख्यरूप॥ सतेजउष्णज्ञानमयदेख॥ विराटआकृतीसुरेख॥ सामर्थ्य
अत्यद्भुत॥१८॥रुपांतरामुळेंसतत॥ध्वनीआणिसामर्थ्यप्रगटहोत॥नादज्ञा
नासीरंजवीत॥गतीउत्पन्नयांपासुनी॥१९॥ ध्वनीनोचीश्वासोश्वास॥ॐस्ह
णूनीचालेसाच॥ तोनित्यपरियेसा॥नथांबेकदांपी॥२०॥ कर्मणुकीकरतांत्व-
रित॥मजइच्छाझालीअवचित॥खेळकरावाविचित्रयेथ॥ ज्ञानाचाहापरि-

णाम॥२१॥ इच्छानीकेंधळविद्युल्लतामूर्तिमंत॥ स्त्रीरूपउमन्नीकरतांबनलीस
त्य॥ तीकेवळमाझीसामर्थ्यसरितानिश्चित॥ चितूशक्तीप्रगटली॥२२॥ म-
जशीती अनेकखेळकरून॥ममसेवाकरीअनुदिन॥ निरंतरममआज्ञेवर्तुन॥
रंजवीतसेमनोहरनादें॥२३॥ तिनेंब्रह्मतत्वासीपरब्रह्मतत्वमिळवून॥रचनाके
लीरंगीबेरंगी अतर्क्यपूर्ण॥ आकर्षणशक्तीनेंसर्वसंधान॥ आपुलेंआधीनठेविलें
॥२४॥ अनेकब्रंम्हांडें जिनेंरचिलीं॥वायूवेष्टनांतगुंडाळली॥आकर्षणशक्तीनेंतो-
लिली॥भ्रमणत्यांचेंनियमबद्ध॥२५॥ आकर्षणपृथःकरणप्रतिसारणपरावर्तन
॥रचनाकेली उत्क्रमण॥दिकांपासून॥तिचारमणीयसामर्थ्यखेळपाहून॥आनंदमय
मीसदा॥२६॥ चित्रविचित्रब्रंम्हांडेंबनविलीं॥एकाहुनीएक विशेषठरविलीं॥ऐके-
त्यांचींनांवेंबोलिलीं॥ पूर्वापारतीच्यपै॥२७॥ उपग्रहसर्वांहुनीसान॥त्याहूनश्रेष्ठग्र-
हपूर्ण॥तदूविशेषसूर्यजाण॥ध्रुवश्रेष्ठत्याहुनी ॥ २८॥ ऐसीब्रंम्हांडेंअनंत॥

प० ॥३॥ याचेकक्षीमाजीविराजीत ॥ धूमकेतुसमुदायअमित ॥ दळणवळणाचेंकामकं- हिं०
रिती ॥ २९ ॥ ध्रुवआणिसूर्यस्वयंप्रकाश ॥ इतरतेपरप्रकाशत्यांस ॥ उष्णताआ
णिप्रकाशआसमास ॥ पुरवितीहींवरिष्टब्रंम्हांडें ॥ ३० ॥ ध्रुवमंडळांतअनेकसूर्य
मंडळे ॥ त्यांभोंवतीस्वपरिवारेंफिरतीबळें ॥ उपग्रहासहग्रहरवीभोंवतीफिरे ॥ उ
पग्रहग्रहाभोंवती ॥ ३१ ॥ मंडळाचाजोकांमुख्य ॥ त्याचेआकर्षणअधिकारअत
र्क्य ॥ मंडळांतीलब्रंम्हांडावरीचालतीअशक्य ॥ कांहींतेथेंनसेची ॥ ३२ ॥ उभयत-
त्वांपासोनीकुसरी ॥ अनेकवायुरूपतत्वेंअवधारी ॥ त्यानंतरदृश्यतत्वेंपरोपरी ॥
मतृशक्तीनेंरचियेली ॥ ३३ ॥ आणुरेणुपासोनीब्रंम्हांडापर्यंत ॥ रचनाकेलीअत्यद्भु
त ॥ विशाळतीबहुधावर्तुळाकारसत्य ॥ ब्रम्हांडनामत्यांयाअर्थें ॥ ३४ ॥ स्वयंप्रका
शब्रंम्हांडाचाअधिकार ॥ परप्रकाशब्रम्हांडावरीचालेसाचार ॥ मुद्तशीरलया
पात्र ॥ सर्वहोतीनिश्चयें ॥ ३५ ॥ लहानमोठीआकारमानें ॥ ब्रंम्हांडाचीपरोपरीतें ॥ ॥३॥

गतीपृथकपृथकत्यांकारणें ॥ लाविलीसेजाणपां ॥ ३६ ॥ एकएकाब्रम्हांडाचेअ
धिकारांत ॥ नियमीतसंख्याब्रम्हांडेआहेत ॥ ऐसीब्रम्हांडेंअसंख्यपरिवारासहि
ता ॥ भ्रमतीथापेकळीं ॥ ३७ ॥ तींसर्वनक्षत्ररुपेंदिसती ॥ अंधारांतप्रकाशेंचमकती
॥ कित्येकदूरत्यांचीआकृती ॥ नदिसेमनुष्यांनेत्रांनीं ॥ ३८ ॥ ब्रम्हांडांचेपरस्पराव
र ॥ एकमेकांचेंचालतेंआकर्षणसाचार ॥ त्यांचेगतीभ्रमणेंफेरफार ॥ ब्रम्हांडाव
रीहोती ॥ ३९ ॥ ध्रुवमंडळपृथकएकमेकांपासून ॥ परीध्रुवध्रुवांचेंपरस्परावरीआक-
र्षण ॥ एकाध्रुवाचेमंडळांतीलसूर्यजाण ॥ संबंधएकमेकांशींतयांचा ॥ ४० ॥ सूर्य-
मंडळांतीलग्रहांचा ॥ परस्परसंबंधअसेसाचा ॥ ग्रहमंडळांतील उपग्रहांचा ॥ त्याच
परी ॥ ४१ ॥ सर्वांचासंबंध ॥ आकर्षणेंअबाध ॥ असेममशक्तीसी, अगाध ॥ सृष्टी
रचनाममइच्छें ॥ ४२ ॥ फेरफाराचासंबंधपाही ॥ सर्वपदार्थप्राणीमात्रावरीहोई ॥
तदनुसारशुभाशुभहोतजाई ॥ जोतिषानुभवप्रत्यक्ष ॥ ४३ ॥ परीप्रारब्धनाला-

प. अनुसरूनजाण॥ शुभाशुभाचेंकारण ॥ पापपुण्यफळतेंभाक्तनपूर्ण॥ त्यान्वयें हिं.
॥४॥ ग्रहपिडा॥४४॥ जैसेंतंतूचें जाळेंकेलें॥ मध्येंमध्येंमणीगुंफिलें ॥सानमोठेवि
चित्रविचित्रशोभले॥ मध्येंअपूर्वपरब्रम्ह॥४५॥ तंतूतींआकर्षणेंगरंगीबेरंगीम
णीतींब्रम्हांडेंजाणें ॥सर्वांमध्येंशक्तीमहापरब्रम्हरूपेंहें॥ अतर्क्यशोभासर्वांची॥
४६॥शुभ्रवारंगहीनप्रकाश।काळोरवाशीमिश्रित॥ यालागींशामसभामाझीस-
त्याममप्रियेचावर्णपीत॥ अनेकरंगीआलंकार॥४७॥ जितुकेसूर्यध्रुवाच्या
अधिकारांत॥ तितुक्यांवरीसोसत्ताचालवीत॥ सूर्यग्रहउपग्रहावरीसत्य ॥आपु
ल्यामंडळाच्या॥४८॥ प्राणीउदकआणिसमीर॥ भूंवरीचालतोअधिकार॥
भूकंपरोगसाथीआवर्षणवादळेंपरिकर॥ अधिकाराज्ञेपैहोती॥४९॥ आणुरे
णूपासूनपूर्णब्रम्हांडावरी ॥कारभारकरतीजेकुसरी॥ तेलोकरहाती स्वयंप्रका-
शब्रम्हांडावरी॥देवलोकत्यांबोलती॥५०॥तेआणि त्यांचेदूतअदृश्यरूपें ॥९॥

॥ अधिकारांतील ब्रम्हांडावरी ॥ धैनीसाक्षेपें ॥ ग्रहउपग्रहावरील कौतुकें ॥ ऐशारी-
तींतीं होती ॥ ५१ ॥ उत्पत्ती स्थिती लयासी उक्त ॥ ऐशी व्यवस्था तेरारिती निश्चि-
त ॥ पापपुण्यान्वयें शुभाशुभ भोगविती सत्य ॥ तद्रूपें भ्रम अंशमान चमत्कीं ॥
५२ ॥ भोगनूत्याप्रमाणें जन्मवेळ ॥ शकून चिन्हें तीसोज्वळ ॥ भविष्यदाविती अ-
वाजावरून निर्मळ ॥ ओळख जरी नेत्रां आड ॥ ५३ ॥ सानमोठ्या ब्रम्हांडासी ॥
अधिकार उक्त आयुष्यराशी ॥ दिलीसे परी ध्रुवासी ॥ आर्धदीन पैभाझा ॥ ५४ ॥
मीजितकाकाळ जाग्रत ॥ तितुकाची विश्रांती सुशुप्तींत ॥ जागृतीपर्यंत सर्वसृष्टी
रहात ॥ पुढेलयपावे ॥ ५५ ॥ मीविश्रांतींत राहे एकटाजाण ॥ इतर सर्व सूक्ष्मब्रम्ह
परब्रम्ह तत्वीं जाती मिळून ॥ पोरस्थानीं जेकाम शी मिळती येऊन ॥ ते रहातीम
त्स्वरूप्यरूपीं ॥ ५६ ॥ भजशीं स्वन्यविकार नसे ॥ मायामय भाणशीतें पडत-
से ॥ मीमायेपासून अलिप्त असे ॥ जरी भजशीं ती अभिन्न ॥ ५७ ॥ ध्रुवावरी

प॰ मनुष्यवस्तीप्रथम ॥ तींमनुष्येंसूर्यावरीमानवउत्पत्तीकरतीह्मानेम ॥ सूर्यावरीलतेक- र्हिं
॥५॥ रितीउत्तम ॥ ग्रहउपग्रहांवरीपै ॥ ५८॥ तोचीअनुक्रमइतरप्राण्यांशीं ॥ जडसृष्टी-
होयएकदांची ॥ तीअल्पप्रळयींनष्टनहोयसाची ॥ परीइतररसर्वक्षय ॥ ५९॥ एक-
एकासूर्यमंडळासाठी ॥ ध्रुवावरीपृथकपृथकवस्ती ॥ सूर्यावरीतेच्चरिती ॥ ग्रहउपग्र-
हांकारणें ॥ ६०॥ सूर्यावरीलवस्तीजेव्हांजीनिजत ॥ तेव्हांतिच्चब्रम्हांडावरअल्पप्रळय
होत ॥ ध्रुवावरीलवस्तीसमुळींचनिद्रानसेसत्य ॥ अल्पप्रळयींसर्वक्षय ॥ ६१॥ ब्र
म्हांडमात्ररहात ॥ पृथ्वीवरीलसर्वनष्टहोत ॥ तोअल्पप्रळयनिश्चित ॥ महाप्रळयीं
ब्रम्हांडक्षय ॥ ६२॥ जागाहोतांअनंतकोटीब्रम्हांडनायक ॥ सर्वरचनाहोयउत्पन्न
सुरेख ॥ तैशीच्चसूर्यावरीलवस्तीउठतांदेख ॥ ग्रहउपग्रहांवरउत्पत्ती ॥ ६३॥ महा-
प्रळयाचासमय ॥ अल्पप्रळयाशींमिळूनहोय ॥ सर्वनियमसमीरक्षितजाय ॥ माया
तीअनियमीत ॥ ६४॥ ध्रुवावरीसमीरप्राशसेवन ॥ रवीवरीप्रधूरसुधापान ॥ ग्रहां-

वरीअन्नोदकपान ॥उपग्रहींनीरनिर्मळ ॥ ६५॥ जगअस्तित्व अथवास्थितीस॥ अ
नुसरूनवागणेंजेंनीती अथवापुण्यसाच ॥ विरुध्दती अनितीवापाप,नाश ॥ दुःख
खेदत्यांपायीं ॥ ६६॥ उत्पत्तीपासूनीप्रळयापर्यंत ॥ पातकबाढतजायसत्य ॥ देव-
सत्वतैसेंचीकमीहोत ॥ अंतीयोगप्रळयाचा ॥ ६७॥ अस्तित्वपरनीती तीचपुण्य
[illegible] ॥ आचरतांउपग्रह,वरील वस्तीवास ॥ सोडूनजाय ग्रहलोकांस ॥ तेथूनजाणेंदे-
वलोकीं ॥ ६८ ॥ देवलोकतोचीस्वर्गजाण ॥ स्वयंप्रकाशग्रहींत्यांचेंस्थान ॥ वायूकु
ण्यातआकर्षण ॥ यामार्गेंगमनतेथें ॥ ६९॥ सूर्यलोकींजेजीवतेनेंवागती ॥ तेध्रुवलो
कांप्रतीजाती ॥ तेथूनपुढीलगती ॥ ममपदाची ॥ ७०॥ ममपदींपुनःनसेजन्ममरण
॥पुढीलसमयीं ध्रुवपदींत्यांसनेमून ॥ त्यांचेहातेंरचनाकार्यमाझाआपण ॥ ममइच्छे
करीतसे ॥ ७१॥ परीकोणतेंहीब्रम्हांडावरीलमनुष्य ॥ ममज्ञान भक्तीरत होयनित्य
॥ विरक्तेनें अहंभावविसरत ॥ तोपावेमोक्षपदां ॥ ७२ ॥ ममस्थान तोमोक्षजाण ॥

प. तेथेंज्ञानीरहातीमजमाजीलीन ॥ त्यांशींवारंवब्रम्हांडावरीजाण्याचेंकारण ॥ नाहींच
॥६॥ कदांकाळीं ॥ ७३ ॥ पुण्यवानाकरतांब्रंम्हांडेंवरिष्ट ॥ ज्ञानीभक्तासीममहृदयसंपुट ॥ अ
ज्ञानभक्तीसीपुण्यवानाचीवाट ॥ धरावीलागे ॥ ७४ ॥ पुण्यापासूनीसुखमिळेल ॥ भ
क्तीनेंसुबुद्धीसुस्वभावहोत ॥ पापफळदोंविरुद्धसत्य ॥ सत्ज्ञानभक्तीनेंमोक्षमार्गी ॥
७५ ॥ जगहेमाझीकर्मणुक ॥ त्याचेअस्तित्वाविरुद्धदेख ॥ आचरणकरितीजेलोक
॥ तेचपातकीजाणिजे ॥ ७६ ॥ पातकामुळेंदुःखखेदभोगणें ॥ फारहोतांखालचे
ब्रम्हांडीजन्मपावणें ॥ त्यांशींजन्मरहाटींफिरणें ॥ नचुकेकदांपी ॥ ७७ ॥ पापपुण्या
चासंबंधनिश्चयेसी ॥ असेफक्तमनुष्ययोनीसी ॥ आणिकाअज्ञानभाष्यांशीं ॥ त्यांचें
कांहींनसेची ॥ ७८ ॥ मनुष्यांमाजीदोनभेद ॥ एकअज्ञानअरण्यवाशीअशुध्द ॥ दुसरी
तींज्ञानविद्याभरेंअगाध ॥ कर्तुत्वतयांचें ॥ ७९ ॥ शरीरपोषणआणिरक्षण ॥ तशींच
सर्वषड्रिपुआधीन ॥ परीरचनाआणिरचणारासंबंधीज्ञान ॥ कदांपीनसेसर्वां ॥ ८० ॥

णांनिरमादी अक्षयभेदजाण ॥ आहारनिद्रामैथुन ॥ भय उद्योग अवश्यक पूर्णा ॥ श-
त्रुगुणते रिपू ॥ ८१ ॥ विद्याज्ञानेंजांची स्थिती सुधारली ॥ तींरहाती सुखसोहळीं ॥ त-
ऱ्यावाईटाचें ज्ञानसकळी ॥ त्यांपाशीं वसतसे ॥ ८२ ॥ नेंसमजतां लेंपातक ॥ त-
रीदोषन सुटेदेख ॥ परीजाणूनीतेआचरतां अविवेक ॥ चतुर्गुणदोषघडे ॥ ८३ ॥ सूक्ष्म
जीवनसमजतीनादिसतीनेत्रांनीं ॥ स्वाभावीकपणें मरतीं अनुदिनीं ॥ तेंन घडे पात-
क ॥ पापसंबंधवरिष्ठजिवासी ॥ ८४ ॥ प्राणीमात्रांचेंमन प्रतिबिंब अ-
से ॥ परीमनुष्यमरनकांतमी विशेषअंशरूपवसे ॥ मनअंशप्राण ॥ संस्मृती विचार पु-
रवीतसे ॥ जसेंपुर्वार्जित ॥ ८५ ॥ पुर्वार्जिताचासंबंधनसेजरी ॥ मग विचारावर प्राणपू-
र्णसत्ताधारी ॥ वाईटबरातो विचारकरी ॥ स्वतंत्रपणें ॥ ८६ ॥ माझे अंशाचे ठिकाणीं
देवराहून ॥ बुध्दीचालविती प्राणी कर्मासमान ॥ परीदृढनिश्चयीं असतां प्राण ॥
चालूंन देकोणाचें ॥ ८७ ॥ याप्रमाणें कर्तुत्व प्राणाचे हातीं ॥ म्हणोनी फळें भोग-

प. गेंत्यामती ॥ इंद्रियेंअवयवत्याचेइच्छेनेंवागती ॥ इच्छातेंमनमुर्तीमंत ॥ ८८ ॥ आ आ. हिं.
॥७॥ णवसेहृदयांत ॥ ममअंशमस्तकींसाहित्यासहित ॥ शद्गुरिपुमयप्रमाणरहात ॥ लोमा
यामयअत्यल्पअंशमाझा ॥ ८९ ॥ त्यासीसारासारविचारज्ञान ॥ मस्तकींच्याममअं
शापासून ॥ इतरप्राण्यांच्यामस्तकींमीअसून ॥ अल्पज्ञानमजठाईं ॥ ९० ॥ मस्त
कींच्याममअंशांत ॥ स्मृतीराहेमजसवेंशांत ॥ कर्मानुसारतेंवेंआणिशत्रुगुणांचेअ
गकमजास्त ॥ असतेंप्राणिकाजां ॥ ९१ ॥ ममकृपेंस्वभावांलचांगूलपण ॥ येतवि
द्याशीकरून ॥ विद्यामाहितीपरीज्ञान ॥ घालेंतिजपासुनी ॥ ९२ ॥ विचारसामर्थ्यां
चीज्ञान ॥ सर्वज्ञानांतममज्ञानविद्याउत्तम ॥ त्यापासुनिमोक्षधाम ॥ प्राप्तहोयत्या
रितें ॥ ९३ ॥ सानमोठेंज्ञानतंतूव्यापकशरीरांत ॥ त्यांयोगेंमाझासंबंधआणाहीं
होत ॥ परीमाणाशींममदर्शनमस्तकींकष्टेंहोत ॥ योगाभ्यासें ॥ ९४ ॥ आनंदसौंदर्य
गायनवादन ॥ यांयोगेंज्ञानतंतूप्रफुल्लीतहोतीजाण ॥ दुःखेंआणिखेदंविरसहोऊन ॥ ॥७॥

॥ स्थितीदावितीमुखावरी ॥ ९५ ॥ सर्वज्ञानतंतूतमनफिरल ॥ परीकस्तकांतीलज्ञानतं
तूजाळ्यांत ॥ विचारस्मृती असतीसत्य ॥ जरूरतेत्त्यांचास्प्राणा ॥ ९६ ॥ प्राणाशीं
मनाचानित्यसंबंध ॥ नेत्रकर्णादिकांशी अबाध ॥ सर्वदेहींत्त्वेरं अगाध ॥ तेंसदांकिस्
तसे ॥ ९७ ॥ मनेंसुचवितां प्राणक्रीयाकरी ॥ इशविचारेंभ्रत्यांसअव्हेरी ॥ अथवा
स्वपराक्रमेंही आवरी ॥ जरीकृपापैमाझी ॥ ९८ ॥ जाळ्याशींवरीलवेष्टनस्मृतीचें
॥ त्याचेंआंतीलविचाराचें ॥ त्यांतरभागी स्थानमनअंशाचें ॥ वरीलवेष्टनासंबं
धकर्णनेत्रां ॥ ९९ ॥ परीतोसंबंधमनाच्याद्वारें ॥ प्राणाशींमात्रपरभारें ॥ मनाशि
वायज्ञानतंतूचीगतीहरे ॥ मायारूपमनचपळपै ॥ १०० ॥ मनतेंसदांनिर्भय ॥ वि
चारेंभय उत्पन्नहोय ॥ मनपराधीननसतेंमगकाय ॥ सृष्टीधारणाकेवीती ॥ १०१
॥ मायाचंचळअत्यंत ॥ अविचारेंकर्मणूकपुरीनहोऊंदेत ॥ मीसुविचारेंतिशीनि
यमनध्वसत्य ॥ केलीअसेजाणपां ॥ १०२ ॥ मायाअशुभआणिअस्वच्छ ॥ तीन

न्मभरणाके त्यांत ओढीत ॥ मीदयेनेंनोती आणिसत्यानंद्दावित ॥ माया मिथ्या
मार्गवर्ती ॥ १०३ ॥ पापघडलीयाजरीहोयपश्चात्ताप ॥ ममभक्तीकरीअसूप ॥
नदूनर्तनंदेखूनिपाप ॥ निमेभगक्षमाहोय ॥ १०४ ॥ जेकांदृढनिश्चयीजन ॥ मनबु
ध्दीसाइरिपूधरतीआचरोन ॥ करितीसन्मार्गानेंबळेंचीआकलन ॥ पापसालन
र्धांश ॥ १०५ ॥ ज्यासीझालेंब्रम्हज्ञान ॥ गुरुद्वारेंसुकृतेंकरून ॥ विरक्तमाझेठा
यींजोसदांलीन ॥ तोजिवन्मुक्तपैजगीं ॥ १०६ ॥ बुद्धीचे अर्थदोन ॥ बुध्दीम्हण
जेस्वाभावीकज्ञान ॥ किंवाबुध्दीम्हणजेकृत्यसंकल्पजाण ॥ आणकरीस्वातंत्र्यें ॥
१०७ ॥ याग्रहाचेंनांवपृथ्वीजाण ॥ तिचेसूर्यग्रुबअत्यस्तनेत्रांन ॥ दिसतीया भूम
डळांतील इतरग्रहलहान ॥ उपग्रह हीकित्येक ॥ १०८ ॥ चंद्रतोपृथ्वीचाउपग्रह
॥ येथीलप्रवाहीपदार्थावरपाहे ॥ त्याचेंसदैव आकर्षणचालत आहे ॥ त्यान्वयेंभ
रतीओहोटी ॥ १०९ ॥ भरतीओहोटीचासंबंधपाहे ॥ आणीरक्काशींहीलागन ॥८॥

ताहे॥सवाहीपदार्थतितुकाराहे॥तयाचे आकर्षणीं॥११०॥ आतांसांगतोंतुजयुक्ता
युक्तविचार॥मुख्यपुण्यपापेंसाचार॥जींसर्वधर्मशास्त्रींग्राह्यफार॥बहुमहत्व
यालोकीं॥१११॥त्यान्वयेंधर्मशास्त्रेंसुधारतां॥सर्वांससुखहोईलतत्वता॥ या
भूलोकींत्यांसअनुसरूनवागतां॥ आनंदभासहोय॥११२॥कालस्थितिनुरूपसु-
धारणा॥धर्मशास्त्रींकरणेंसुजाणा॥परीविरुद्धनव्हावेंममवचना॥सत्सुधार
णासर्वकार्यीं अवश्यक॥११३॥वस्त्रालंकारआचार॥देहरक्षणायोग्यअसावेफा
र॥स्वच्छतानीतीनेंवागनांममभक्तीपर॥अंतःकरणावळविती॥११४॥निश्चया
नेंसिद्धिभास॥ भावाचेठायींमीरहात॥अंतरसाक्षचराचरव्यापकसत्य॥
मीएकअसे॥११५॥स्वदेहरक्षणेंमोठेंसुकृत॥ देहाविणेंममप्राप्तीकैसीहोतादे
हसर्वकारणअसेसत्य॥माझ्यामहतकार्यींमात्रत्यावेचावें॥११६॥जैशीहवा
जेथींचीपाही॥तैसेवस्त्रालंकारआचारनाहीं॥ मंगदुःखाउणेंनसेकांही॥तेंए-

 कपातकजाणिजे ॥ ११७ ॥ व्यवहारकाळवेळयांशीं ॥ आचारविचार विरुद्धन- 
 सावापरियेसी ॥ मानवसुखानुरुपसाची ॥ रचनात्यांचीअसावी ॥ ११८ ॥ पूर्ण-
नीतीनेंवागतां ॥ अधिकारीहोयममपंथा ॥ ममभक्तीनेंममज्ञानीमिसळतां ॥
मोक्षप्राप्तीसकायउणें ॥ ११९ ॥ आत्महितामागूनीस्वसमाजहीत ॥ त्यानंतरपहा
वेंमनुष्यमात्राचेंनिश्चीत ॥ समाजविनासुखनसेप्राप्त ॥ मुख्यनीतीहीएक ॥ १२०
॥ श्रीमंतासीसुबुद्धीनक्षणें ॥ हेंमायेचेंसामर्थ्यजाणें ॥ गरीबादयेनेंसुबुद्धीदेणें ॥
हेंममकृत्य ॥ १२१ ॥ नानातऱ्हेचेशोधकरणें ॥ मनुष्यसुखाच्यासोईवाढविणें ॥ हेंहोय
बहुतपुण्य ॥ निःसंशयफलप्रद ॥ १२२ ॥ पापपुण्याप्रमाणें ॥ मनुष्यासीजन्मयेणें
आणिकइतरप्राणीमनुष्यहोणें ॥ अनुक्रमेंहेंहोय ॥ १२३ ॥ आणतोमायामय अमर
॥ देहत्यागीलेईवारंवार ॥ मोक्षविनाप्रळयापर्यंतसाचार ॥ कष्टभोगीनानापरी ॥
१२४ ॥ मीःकर्मणुकीकरतांउद्योगकेला ॥ त्यानेंचित्तीं आनंदझाला ॥ परीव्यवसायक 

रणेंपडला ॥श्रमा अंतींसुखहोत॥ १२५॥ म्हणोनी अपायास उपायकरणें ॥उपाय-
प्रयत्नेंमीं संतुष्टहोणें॥ निश्चयउद्योगसंकटींहीनसोडणें ॥तेणेंफलमींदेतसे॥१२६
॥महत्कार्यींमी अंतपहात ॥ निश्चयेंसंतुष्टत ॥मगइच्छिलेंफलदेत ॥ जरीपात्रलां-
होयत्यां॥ १२७॥ उत्पत्तीजशी अधीकहोतजाई॥ अनितीतैसीवाढेपाही ॥जाणुनी
अपारपातक होयतेसमयीं॥ नाशापात्रहोतसे॥ १२८॥जैंपातकफारहोय ॥मगहो
य अल्पप्रळय ॥तैंदेवसुशुमीचीवेळहोय।हेंसामर्थ्यमायेचें॥१२९॥ महाप्रळयाचे
समयीं ॥ अल्पप्रळयाचायोगयेई॥ नियमन्यायबध्द सर्वहीं॥ चालवीमींस्वइच्छें
॥१३०॥ इच्छातेउपाधीजाण ॥म्हणूनइच्छारूपमाया अशुभपूर्ण॥ तिचेप्रत्यक्ष-
रूपमन॥ अशाश्वतांकडेधांवे॥ १३१॥ मींजरीदयानकरितों ॥ मनुष्यां सुबुध्दी
नदेतों॥ नीतीस्थापनभक्तरक्षणींउदासरहातों ॥ तरीअल्पप्रळयवारंवार॥१३२
मीनियमीतकाळपर्यंत ॥ नीतीरक्षितोंजगांत॥ सर्वनीती आणिनेमानेंचालवी-

ता॥ म्हणोनी अस्तित्वनीयमबध्द॥१३३॥इच्छेसीसांभाळणें॥आणिनियमबध्द
वागविणें॥ हेंलागतेंमलाकरणें॥ममान्वयीमजप्रिय॥१३४॥ म्हणोनीनीतीनेंम-
जशीप्रिय॥त्याचेंफळतत्काळहोय॥तरीजेंहोणेंसर्वकार्य॥तेंकर्मविचारेंहोत-
से॥१३५॥ पापपुण्यानुसारजेंभोगणें॥त्यांसचकर्मअगरप्राक्तनबोलणें॥ तेंक
ळतनसेयेथेंमनुष्यांकारणें॥ म्हणोनीसदुद्योगनसोडावा॥१३६॥ जगास्तिल
सविरुध्दतेंपाप॥ अवश्यदयामायानसतांपापदेख॥ राजसिक्षाइआलीया आपो-
आप॥ पुढील भोगणें चुके॥१३७॥ मायातीममभक्तीनकरूंदेत॥ सदैवअशाश्व
तसुखावरीहेत॥ परीज्ञानीतेमजकडेरत॥ नीतीमार्गेवर्तूनी॥१३८॥ मीअंसपूर्ण
सद्गुणी॥ मायातीदुर्गुणी॥इतरांमाजीउभयगूणअसतीजाणी॥ कर्मानुसारक
मजास्त॥१३९॥ माझ्यास त्यरुपाचेंजरीनहोयज्ञानजाण॥ माझ्यानावेंअर्चीका-
पाषाण॥ मीसर्वव्यापीत्यांतवसोन॥फलप्राप्तीदेतसे॥ १४०॥ परी अशाभक्तीला

मोक्षनसे॥ सुबुद्धीज्ञानसुखमात्रमिळतसे॥माझेमुख्यरूपाज्ञानीभजतसे॥ मोक्ष-
नाहीत्यासद्वर्तनें॥१४१॥ जपतपपूजनआर्चन॥ अनुष्ठानहोमहवन॥हींब्रम्हज्ञान-
ध्यानयोगापुढेंगौण॥ममुख्यरूपमोक्ष॥१४२॥ तथापीत्यांसअसत्यनमानावें
॥त्यांग्राह्यसमजोनीवर्तावें॥ सभोंतीच्यामनुष्यांमिळूनवागावें॥तरीचतोधन्य॥
१४३॥दुसरीवस्तुउत्तममिळत॥ तरीपहिलीत्यागूंनयेसत्य॥ तीहीठेवितांअधीकउप
योगहोत॥ ऐक्याविरुद्धनव्हावें॥ १४४॥जगअस्तित्वासऐक्यअवश्यक॥देहा
सीहीसुखत्यापासूनदेख॥ ऐक्यतीचमायासुरेख॥जगतीजवीणनचाले॥१४५
॥ऐक्यनसतांदुःखहोई॥तेंमहत्पापहोयलवलाही॥ परीत्यांतहीनीतीनेमअवश्य
पाही॥ तींनसतांऐक्यकष्टमय॥१४६॥ जितकेंऐक्यविशेषजाण ॥ तितुकेंसुखअ-
धीकमिळेपूर्ण॥ मजशीप्राणाचेऐक्यझाल्याविण ॥मोक्षप्राप्तीनहोय॥१४७॥
मूर्तिपुजादिमार्गगौणजरी॥नीतीमार्गकळेझडकरी ॥ मोक्षमार्गाप्रवेशहोय॥

तींच्याहातीं ॥ त्यांनींवागणेंपतीइच्छानुरूपनिश्चिती॥ त्याअबलापतींचीसेवा
करिती ॥म्हणोनीभोगणेंऐसेपरी॥१५६॥ पतीभार्याजयापरी॥ तैसेंचगुरु-
सिष्यअवधारी॥ पापपुण्याचेवांटेकरी॥ एकमेकांचेजेवीपितापुत्र॥ १५७
॥ज्ञानविद्यामम भक्ती ॥ देणारगुरुसीहेसंबंधलागती ॥ सद्गुरूचीतीसुसं-
गती॥मोक्षपदांदावित ॥१५८॥ संगती आणिगुरुत्वावीण ॥ कोणीकांहींन-
शिकेजाण॥ संगतीऐक्याचेमहत्वथोरपूर्ण ॥ सुसंगतीअमोल्य॥ १५९॥उ-
द्योगनकरतांमहापाप ॥ इंद्रियाचयवोपयोगनकरतांममकृत्यभंगदुःख ॥उद्यो-
गाविणेंकदांपीहीसुख॥ श्रामजोहेप्राणिमात्रां॥ १६०॥ मीतोआनंदीसदय॥
ममभार्याक्रूरदुःखमय॥जगत्कारणांकरतांहोय॥ऐसीरिती॥ १६१॥ यु-
क्तीनेंकार्यकरावें॥ त्यांतसर्वसाधावें॥ इच्छारूपमायेसीलंपटनव्हावें॥ सु-
मार्गागामती अवश्यक॥ ॥१६२॥जेव्हांपुण्यमध्यमअसे॥ तेव्हांत्याचब्रम्हां

प॰। त्वरी ॥ शिवायदेहहिल ॥ १४८ ॥ जैसा अनुक्रमब्रम्हांडाचा ॥ मी अधीकउणातैंराहे हिं॰
॥११॥ तैसा ॥ ध्रुवावरीलमनुष्यांत विशेषअंशासाचा ॥ ज्ञानसामर्थ्यहीअधिक ॥१४९
॥ उष्णताआकर्षणविद्युलता ॥ यारूपेंमीजगव्यापकतत्वता ॥ चराचरदेव आ-
णिदेवदूता ॥ माजीमीवसतसे ॥ १५० ॥ सुखापासोनी आनंद ॥ दुःखापासोनी
होयखेद ॥ पापपुण्याचाहाभेद ॥ ममकर्मणुकीकारणें ॥ १५१ ॥ मायेचेंविशे-
षरूपस्त्रियाजाण ॥ तयांनीपुरुषइच्छेवर्तावेंपूर्ण ॥ उत्पत्तीस्थितीसीमदतकरू-
न ॥ पातीव्रतेंसुखवर्तनेंरहावें ॥ १५२ ॥ त्यांशींविद्याज्ञानद्यावें ॥ परीराजकार-
णींनियोजावें ॥ महत्कार्यपराक्रमांत्यां अयोग्यजाणावें ॥ हामार्गउत्तम ॥
१५३ ॥ जिचेगाठींसुकृतविशेष ॥ तीसज्ञानहोयप्रास ॥ मगमोक्षपंथमिळत ॥ पु-
रुषसंगेंतयातें ॥ १५४ ॥ विवाहीतस्त्रियापतीच्यावाटेकरिणीसुकृताच्या ॥ परी
पतीसरुकीपापपुण्याच्या ॥ वाटण्यापैंयेती ॥ १५५ ॥ स्त्रियांसवागविणेंप- ॥११॥

डीजन्ममिळतसे॥ अतीपापामुळेंजातसे॥ खालचेब्रम्हांडी॥१६३॥ आधीकपु-
॥१२॥ ण्याचीजोडी॥ तरीजन्मस्वर्गीवरीलब्रम्हांडी॥ याविषयींचे नियमअवघडी॥ नपुरे
वेळसांगावया॥ १६४॥ नेमनिश्चयहासद्गुण॥ मनोनिग्रहमजआवडेमनापासून॥
इच्छिलेंतेंमीपुरवीन॥ भाक्तनाचायोगजेसा॥ १६५॥ परीशुभइच्छाअसतां
परिणामशुभ॥ अशुभाचातोहोयअशुभ॥ मंत्रविद्येचारचनाकोंभ॥ यामुळेंउद्भ
वला॥ १६६॥ कृतीनेंआकर्षणादीगूण॥ उत्पन्नहोतीनलगतांक्षण॥ तोडग्यां-
चीउत्पत्तीत्यांपासून॥ मोहनादीप्रकार॥१६७॥ उद्योगासीऐसेंचिफळ॥ मि
ळतसेसोज्वळ॥ परीअशुभहेतूअसतांनिश्चळ॥ परीणामदुःखप्रद॥१६८॥
पापापासोनीदुःख॥ पुण्यामुळेंनिश्चयेंसुख॥ ज्ञानभक्तीचापरिणामदेख॥ मो
क्षप्राप्ती॥१६९॥ ज्यांचीसुकीर्तीजनांत॥ त्यांशीस्वर्गवासहोत॥ सुकीर्तीवि
णेंमरतोसत्य॥ पशूचकेवळजन्मला॥१७०॥ इतरप्राण्यांहुनीविशेषज्ञान॥ ॥१२॥

मनुष्यांशीं दिधलें प्रमाण ॥ सुखोपभोगाविणें पुरुषार्थ न होय त्यांच्या न ॥ तरी जन्म व्यर्थ ॥ १७१ ॥ दुसऱ्यांसी दुःख देणें ॥ अथवा त्यांचा हक्काभिलाष करणें ॥ इतरां प्राण्यासी वृथा वधणें ॥ हें पाप जाण निश्चयें ॥ १७२ ॥ परोपकार तें पुण्य ॥ परी त्यानें इतरांन व्हावें दैन्य ॥ मग तो परोपकार धन्य ॥ बहु पुण्य जोडे ॥ १७३ ॥ देहपोषणा नसे अन्य उपाय ॥ आत्म अगर अन्य प्राणांचें रक्षण होय ॥ तें निरुपायें हनन करणें काय ॥ पातक न घडे ॥ १७४ ॥ अन्य साधनें असतां शरीर पोषणा ॥ जरी हिंसा करिती मनुष्यें जाणा ॥ तरी अल्प पातक घडे त्यांना ॥ अहिंसा मार्ग प्रशस्त ॥ १७५ ॥ एक अविचारें कैफ करिती ॥ गुंग होऊन संकटीं पडती ॥ दुःखी अल्पवयीं होती ॥ म्हणूनी मादक पदार्थ निंद्य पै ॥ १७६ ॥ परी हृदमनें विचारें तो उपयोगितां ॥ तदाधीन होऊन न बाधू देतां ॥ शौर्य धैर्य चातूर्यानंद होय चित्ता ॥ तरी पातक न संचीं ॥ १७७ ॥ तथापी भुक्तींच त्यास्पर्शन करितो नर ॥ तो मोक्षाधिकारी होय सत्वर ॥ पाप निरूढ होय तो-

निर्धार॥ दिर्घायुष्यींसद्गुणीजाणपां॥ १७८ ॥ स्वदेहासीपापीतोदुःखदेत॥ अथ
वाआत्महत्याकरीत॥ पोटासाठींदेवाचेंनिमित्तकरूनभीकमागत॥ उद्योगसामर्थ्य
असोनी॥ १७९॥ असेपातकाचेअनेकप्रकार॥ धर्मशास्त्रींप्रसिध्दथोर॥ परीस
त्यआणिसर्वधर्मशास्त्रांचेंसार॥ तेंतुजकथीतसे॥ १८०॥ ज्यांच्यामननेंकरून
॥ सत्यनिवडेलनवनितासमान॥ तेंहेंतुजदेलोकहिताकारण॥ घृतकरीलोकसाद्यें
॥१८१॥ स्त्रीपुरुषांचाविवाहपाहे॥ त्यांचेमताविनाकरूंनये॥ पुरुषवय स्त्रिहूनी
अधिकहोय॥ तरीचजोडासाजिरा॥ १८२॥ निदानआठआणिबारावर्षांचें॥ व
यअनुक्रमें स्त्रिपुरुषांचे॥ झाल्याविनाविवाहासाचे॥ नव्हतीयोग्यतीं॥१८३॥
स्त्रिहूनि पुरुषाचेंवय॥ निदानचारवर्षेंअधिकहोय॥ परीवीसवर्षांहुनीअधिकन
साय॥ अन्यथादुःखप्रद॥१८४॥ माझीभक्तीआणिज्ञान॥ जन्मांतहीनिष्टन
होयजाण॥ बुध्दीत्यापरीचपूर्ण॥ उपजतांची॥ १८५॥ पापानेंभक्तीज्ञाननष्टहोत ॥१२॥

मतीभ्रंषेपरीपुण्यानेंवाढत॥ विशेषवाढलांचढत॥ममसानिध्याकडे॥ १८६॥अं
तीआशाहेंशरहातासाच॥पिशाच्चयोनीप्रासत्यास॥कर्मानुसारछळीशत्रूस॥
अन्यथाकांहींनचलेची॥ १८७॥ पुण्यजोरेंसुटेपिशाच्चयोनी॥ अथवाशत्रूल
जेव्हांजायसरोनी॥ पुण्यपोंचतेंसंकल्पानीं॥ अन्यजन्मींही॥ १८८॥ कोणीअ
क्षयपुण्यसत्रेंस्थापिती॥ अन्नसत्रें औषधालयेंज्यारिती॥ चालूपुण्याचें फळ
अत्न्या मिळेनिश्चिती॥ज्यास्थळींतोअसे॥ १८९॥ पापपुण्यसंकल्पकरून॥ दे-
तांयेतेंदुसऱ्यालागून॥ यावरून धर्मविधी क्रियाकर्मेंजाण॥ व्यर्थनसती धर्मशा
स्त्रीं॥ १९०॥ सत्धर्मनीतीस्थापनासाठीं॥ ममअंशदेवअवतारघेती॥स्थितीस
जरूरतीरितीस्थापिती॥ऋषीश्रेअज्ञानविभांडोनी॥१९१॥असत्यभाषणनक-
रावें॥ परीप्राणरक्षणानिरुपायेंबोलावें॥जगस्थितीराखण्याकरावें॥ मिथ्या
भाषणनिरुपायें॥१९२॥ कोणाच्याही अभिप्रायाविण॥त्याचेंकांहींनघ्यावें

प. जाण॥ऐसीपापेंअनेकथोरसान॥प्रसिद्धतींलोकीं॥१९३॥चांगल्यागोष्टींच्याआ हिं.
॥१४॥ पिगुणाचा॥ अभिमानठेवावासाचा॥ प्राणहीखर्चीस्वधर्मआणिसन्मार्गीकरतां
तोमजबहुप्रिय॥१९४॥ पापपुण्याचे अनेकप्रकार॥ सुखदुःखफळेंकर्मेंतदनुसा
र॥ द्रव्यापासूनीद्रव्यमिळणार॥ वस्त्रांपासूनीवस्त्रेंपै॥१९५॥ अन्नापासोनीअ
न्नमिळत॥जीवरक्षिल्याआयुष्यवाढत॥ ऐसेप्रकारअसतीबहुत॥त्यांचाहिशेब
सूर्यलोकीं॥ १९६॥ आयुष्यकमीभोगणेंविशेष॥ ऐसेहोतांपुढीलजन्मींसेष॥भो
गणेंपडेप्राणास॥सत्यजाणिजे॥१९७॥ भोगतृत्वाचाकाळनिश्चित॥ नियमा
नुसारहोयसत्य॥ अज्ञानतेमानिती असत्य॥ मृत्यूलोकींऐसीस्थिती॥१९८॥ज
न्मापासोनीसद्वर्तनी॥ तोसदैवदुःखीराहेजनीं॥ दुर्वर्तनी सुखभोगी अनुदिनी
॥हींचिन्हेंपुर्वार्जितांचीं॥१९९॥ मनहेंप्राणाचेजोडीदार॥ किंतेंत्याचेअंतःचरणुसा
र॥स्वप्नींबंदसर्वव्यवहार॥परीमनकारभारकरी॥२००॥ ज्ञानतंतूसूक्ष्मप्रकार ॥१४॥

॥त्यांस आणिदेहास सुशुप्ती विश्रांतीनदेतांसत्वर ॥ अस्वस्थदेहमनकरणार ॥नि-
द्राअवश्यममअंश ॥२०१॥ योगाभ्यासेंमस्तकांतमाझेंदर्शन ॥ प्राणासीहोयस-
त्यज्ञाण ॥ परीभावनेप्रमाणेंमन॥ रूपमाझेंदावीत॥२०२॥ नयनावीणप्राणा-
सी॥ मनदावीवस्तुसी॥जोप्राण आवरीचंचलमनासी॥ तोधन्यपृथ्वीवरी ॥२०३
॥मनमायारूपत्याचीसुखाकडेआवडी ॥ प्राणासीतेंतिकडेंचओढी॥ परीसूक्ष्मा
ज्ञाविचारघेघडोघडी ॥ तरीतोसन्मार्गी ॥ २०४॥ मधूरभाषणशांतमन॥ परोप
कारीअसावेंअंतःकरण॥ माझीभक्ती आणिध्यान॥ करितांराशीपुण्याच्या॥
२०५॥योगाभ्यासेंमाझीभक्ती॥ किंवाध्यानमार्गेकरोती॥ दोहोंचीहीसमाधी
मयएकचगती॥ पूजनआर्चनादिहुनीश्रेष्ट ॥२०६॥ज्याधर्मांतअधिकारीरू
पेंमीजन्मदेतों॥ त्याचधर्माअनुसरूनवागतो ॥ सध्दर्माकारणेंसर्वहीउध्दमानि
तो ॥तोमजप्रिय॥२०७॥ स्वजनशत्रूत्यां आत्मशत्रूगणावें ॥ प्रयत्नेंत्यांसआ-

प. कर्षावें॥ ऐशा परोपकारा करावें ॥ तेणें संतोष मम मानसीं॥ २०८॥ उत्पत्ती स्थिती हिं.
॥१५॥ आणि लय प्रचंड॥ हें सर्वां मागें लागलें उदंड॥ परी नियमबद्ध सर्व अंड ॥ निशी
स्थिती कारणें ॥२०९॥ हें सर्व अशाश्वत जाणून॥ पुण्य आणि ज्ञान जोडावें पूर्ण॥ दे
हरक्षणां सन्मार्गीं व्यवहार करून॥ सुखानुभव घेत जावा ॥२१०॥ सुख कीर्ती आ-
णि ज्ञान॥ मिळविल्यावांचोन आलें मरण॥ माझे भक्ति विषयीं उदासीन ॥ जन्म
व्यर्थ त्याचा ॥२११॥ स्वच्छता आणि नीती नेंवागल्याविण॥ माझी भक्ती फलप्रद
न होय जाण॥ स्वच्छता अवश्य सर्वां कारण॥ देहसुख ही त्याविना नसे॥२१२॥ जै-
सा ज्याचा आचार विचार॥ तैसी त्याची जाती मुकरर॥ जाती धर्में जो न चाले नर॥ त्या
सी विभक्त ठेवावा ॥२१३॥ जो माझा निस्सीम भक्त॥ ज्ञानी नेमी सुनीतीनें वर्तत॥ मा
झे ध्यानीं निमग्न रहात॥ भूत भविष्य त्या कळे ॥२१४ ॥ ज्ञानी पराक्रमी धीर नर॥ त्या
माझ्या विभुती साचार॥ माझा त्यां माजी अंशाकार॥ वंद्य ते इतरां जनां ॥२१५॥ ॥१५॥

संकटीमज ध्याती ॥ मीधावेत्वरितगती ॥ नीतीरक्षणानिश्चिती ॥ संकटवारीकर्मे
योगें॥ २१६॥ आतांतुलासांगतोमाझाबीजमंत्र ॥ त्याच्येजपानसे धर्माचाबाधअनु
मात्र॥ तोठेवावागुप्तसर्वत्र ॥ अभाविकान्उपदेशी ॥ २१७॥ जोकांअस्पज्ञानीनीती
मान॥ त्यासीउपदेशावामंत्रपूर्ण॥ संसारीहीजपेभक्तीने ॥ तोमजप्रतीपावेल॥२१८
॥ पुर्वेकडेमुखकरून॥स्वस्थचित्तेंबसावेंकरजोडून ॥ डोळेझांकूनमाझेंध्यानधरू
न॥ मनएकाग्रकरावें ॥२१९॥ मगमंत्राचाजपकरावा ॥ त्याचाअर्थध्यानींध्यावा॥
अनुभवेंममदर्शनलाभव्हावा ॥ भावनेप्रमाणेंसत्यजाण॥२२०॥ एकाएकींध्या
नीमींनयेजरी ॥ प्रयत्नकरावावारंवारी ॥ दृढभावअसतांमीनसेदुरी ॥ इच्छितस
र्वपुरवीन॥ २२१॥ जिवन्मुक्ततोप्राणीहोत ॥ मोक्षपदांतोसहजींजात ॥ परीनीती
स्वच्छतापाहिजेत ॥ त्याविणेंसर्वव्यर्थ॥ २२२॥ हाग्रंथगुरुवारीवानित्यवाचिता
॥ पुण्यजोडेज्ञानवाढतां॥ मजसीहोयसंतुष्टता ॥ मगन्युनकाय ॥२२३॥ ग्रंथा-

प. चीपुजाकरून॥भगवाचावालक्षपूर्वकजाण॥शेवटींआर्तीकरून॥मगप्रसादद्यावाद्या॥२२४॥ हिं

॥१६॥ इष्टमित्रसोयरेधायरे॥ तयांबोलवावेंअत्यादरें॥आनंदोत्साहअतीगजरे॥सामर्थ्यतरीक

रावा॥२२५॥अथवागुसताभावेंवाचितां॥ तरीतोफळदेता॥नवसंकरोनींवाचितां॥इच्छि

तफलदेईल॥२२६॥श्रवणपठणाचेंएकचीफळ॥अथवासकाळींस्नानांतरनिर्मळ॥रोज

वाचितांपापमळ॥जावोनीसुफलप्राप्ती॥२२७॥हेंज्ञानकेवळअमोल्यरत्न॥तुजदिधलें-

भावइच्छापाहून॥जगांततेप्रसिध्दकरून॥सज्ञानभक्तीवाढवी॥२२८॥ऐसेंअनंताचेंभाष

ण॥ऐकूनमींबोललोंत्यांलागून॥मीअज्ञानअसमर्थदीन॥केसेंहेंघडेमाझेनी॥२२९॥मगअ-

नंतकोटीब्रम्हांडनायकें॥नाभीकारदिधलाकौतुकें॥तेंधैर्यआलेंनेटकें॥लोकसेवाकरा

वया॥२३०॥यापासोनीजनाचेंहीत॥होकांसज्ञानमार्गविदित॥नीतीस्थापनपरमेश्वर

भक्तीवाढत॥तरीचसार्थकपैंहोय॥२३१॥मींअविद्वानअज्ञान॥क्षमाकराजरीकांहीं

न्युन॥सुजनमाझीउपेक्षानकरून॥ग्रंथादरकरतीलहीआशा॥२३२॥जैसाहिरा- ॥१६॥

पडिला चिरवलांत॥ परीक्षकतोग्रहणकरीत ॥मजअज्ञानापासोनिपरमेश्व-
रशब्दनिघत ॥म्हणूनअक्केरनकरणें॥ २३३॥ धर्मशास्त्रींहेशब्दसिद्धांतअ-
सोचानसोत ॥सद्यस्थितीसजे अवश्यअसावेत ॥ तेंचज्ञानव सिद्धांतस्पष्टकेले-
असत ॥ईशआज्ञें॥२३४॥ कोणी कांहींहीम्हणोत ॥ विश्वंभरेंसांगितलेंजेंसत्य
॥तेंचप्रसिद्धकेलेंअसेनिश्चित ॥परमात्मासाक्षअसे॥२३५॥ मीवैवस्वतत्याच्या-
दास॥गोदातिरींमाघशुद्धपौर्णिमेस ॥शकेअठराशेसोळासिद्धघाटस्थळास॥
ग्रंथराजहासंपविला॥२३६॥इतिपरमेश्वरज्ञानदर्शनकिंवाहिंदुधर्ममतमंडणः
॥श्रीसच्चिदानंदार्पणमस्तु ॥श्रीसिद्धीयशशुभंभवतु॥ शुभमस्तु॥ ७॥ ॥

॥ समाप्तः॥

# सुचना.

हीं बुकें (ग्रंथ) रा. रा. रामकृष्ण श्रीधर यांचे दुकानीं कांदेवाडीचे नाक्यावर मुंबई येथें विकत मिळतील.

माझ्याशीं कोणतेही संबंधांत पत्रव्यवहार करणें अगर पैसा पाठविणें तो माझ्या नांवें सदरहू पत्यावर करावा अथवा पाठवावा.

विक्री करतां एकदम प्रती घेणारास अलाहिदा ठरावानें दिल्या जातील.

ग्रंथ लिहिणारे श्रीगुरुस्वामी महाराज हल्लीं काशीकडे गेले असून त्यांचा पत्ता अद्याप समजला नाहीं.

ज्यानीं ज्यानीं या ग्रंथाचे प्रसिध्दीचे कामांत मदत केली आहे त्यांचे आम्हीं अभार मानतों व ग्रंथ मुदतशीर छापून तयार झाला नाहीं त्या बद्दल क्षमा मागतो.

श्रीमत् स्वामी महाराज पुनः विद्यमान होई तों पर्यंत या ग्रंथा संबंधी वगैरे सर्व हक्क माझेकडे आहेत त्यांनीं आपला पत्ता कळवून, मागिलल्या बरोबर ग्रंथा संबंधी वगैरे सर्व हक्क माझेकडे आहेत त्या सर्वांचा चार्ज त्यांचेकडे देण्यांत येणार आहे. पैसा सुद्धां

ग्रंथाची इंग्रजी, संस्कृत, गुजराथी वगैरे अनेक भाषांत भाषांतरें करून छापवून प्रसिध्द करविण्याकरतां, पुढील धर्म संस्थापनेच्या कामासाठीं म्हणजे धर्मरक्षक

सभारुपी संस्था कशी असावी त्या बद्दलही ग्रंथ करून अनेक भाषांत प्रसिध्द करण्यासाठीं वगैरे द्रव्याची जरूर आहे तरी सर्व स्वधर्माभिमानी व सूज्ञ हिंदु राजेरजवाडे, शेट सावकार व इतर लोक मर्जीनुरूप द्रव्यद्वारा मदत करून आपला दूरदर्शीपणा व धर्माभिमान प्रगट करतील अशी आशा आहे.

आलेल्या रकमां बद्दल पावत्या देण्यांत येतील व आश्रय दात्यांचीं नावें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलीं जातील.

श्रीसत्‌स्वामी नासिक व खानदेश जिल्ह्यांत कांहीं महिने असल्या बद्दल पुष्कळांस ठाऊक आहेच.

हीं बुकें (ग्रंथ) मुंबईयेथें फणसवाडीचे रस्त्यावर मुगभाटासमोर जगद्धितेच्छु छापखान्यांत रा.रा. व्यंकटेश अनंत जोशी यांचे बुकांचे दुकानांत व रा.रा. सदाशिव गणेश मुनशी यांजकडे ही विकत मिळतील.

सि. र. अ.

# मंत्रोपदेश घेऊन ध्यानमार्गानें परमेश्वरप्राप्ती व साक्षात्कारानुभव घेऊं इच्छिणाऱ्या सिष्यांविषयीं नियम.

१. सिष्य सुनितीनें वागणारा, भावार्थी, प्रामाणीक, ज्यास गुरूनें परमेश्वर ध्यानविधी सांगितला आहे, ज्यानें श्रीपरमेश्वर ज्ञानदर्शन किंवा हिंदुधर्ममतमंडण ग्रंथ समजून घेतला आहे, निश्चयी, शांत, निष्कपट पणें उपदेश गृहण करणारा असा असला पाहिजे, मग तो पुरुष असो अगर स्त्री असो प्रौढ मात्र असावा.

२. सिष्यांनीं आप आपल्या धर्मा प्रमाणें वागावें व संसारी स्थितींत असल्यास चिंता नाहीं.

३. सिष्य होण्यापूर्वी रोज निदान दहा वेळांतरी मंत्राचा जप गुरुनें सांगितल्या प्रमाणें करीन, गुरुच्या अज्ञा मान्य करीन व मुख्य गुरुपदाचा हक्क राखल्या खेरीज दुसऱ्यास मंत्रोपदेश करणार नाहीं अशी प्रत्येकानें शपत केली पाहिजे.

मंत्र फक्त परमेश्वर स्थिनी वर्णनमय त्याचीं नांवें असून तीं कोणत्याही धर्मा विरुध्द अगर पंथा विरुध्द नाहींत.

मीं पुनः सिध्द होईन तेव्हां उपदेशाची वगैरे पुढील कामें करीन तों पर्यंत सिध्दी करतां गुप्त रहाणें आहे.

वैवस्वत.